सदरच्या संकेतस्थळांचा सांख्यकीय माहिती मिळवण्यासाठी मोफत वापर केला जाऊ शकतो. यादृष्टीने सामाजिक संशोधकाने संगणकाचा संशोधनात वापर केल्यामुळे संगणकाच्या सहाय्याने मिळालेल्या माहितीचे विश्लेषण करणे, संगणक केंद्रावरून समुपदेश करणे, त्याचप्रमाणे संबंधित वाङ्मयाचे वाचन करणे, चिंतन करणे अधिक सुलभ जाते. या दृष्टीने ऐतिहासिक संशोधकास खालील पायऱ्याचे ज्ञान असणे अत्यंत गरजेचे आहे.

१. माहितीचे संकलन व सांकेतिकोकरण.



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

Scanned by CamScanner

२. संगणकामध्ये माहिती साठवून ठेवणे.
३. योग्य प्रकारच्या सांख्यकीय परिमाणांची किंवा तंत्राची निवड.
४. संशोधनाला अनुरूप असणाऱ्या सॉफ्टवेअर पॅकेजची निवड.
५. संगणकीय प्रोग्रॅमचा योग्य पद्धतीने वापर.

वरील पायऱ्याचा विचार करता ऐतिहासिक संशोधकाला इंटरनेटचा वापर करून माहितीचे संकलन व सांकेतिकीकरण करण्याच्या प्राथमिक गोष्टी माहित असणे गरजेचे आहे. तसेच त्याचे टप्याटप्याने विश्लेषण करण्याचे ज्ञान आवश्यक आहे. संशोधनासाठी असणारी योग्य माहिती पद्धतशीरपणे संकलित केली गेली नसेल तर संशोधकास त्याचे विश्लेषण करणे अवघड जाते. उदा. आपले कौटुंबिक वार्षिक उत्पन्न किती आहे? समजा २ लाख १० हजार रुपये इतके आहे. संशोधकाने एवढीच मर्यादित माहिती लिहून न घेता नोकरीतील वार्षिक उत्पन्न १ लाख २० हजार, दिवसभर सायकलवर फिरून भाजी विकून वार्षिक उत्पन्न ६० हजार आणि शेतीतून वार्षिक उत्पन्न ३० हजार म्हणजे त्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लाख १० हजार रुपये एवढे होते. त्याप्रकारे त्याचे सविस्तर संदर्भासह विश्लेषण करणे महत्वाचे असते. यासाठी माहितीचे सांकेतिकीकरण करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने माहिती संकलनाचे वर्गीकरण करणे गरजचे आहे.

शैक्षणिक संशोधनासाठी संशोधकांना खालील वेबसाइटचा ही वापर होऊ शकतो.

www.research.ibo.org/
www.educationdatabank.in/
www.acer.edu.au/library/thesis
www.eric.ed.gov/

अशाप्रकारच्या वेबसाइटचा वापर केल्यामुळे संशोधकाचा वेळ वाचू शकतो. तसेच संशोधन नियोजित वेळेत पूर्ण करण्यास मदत होते.

संशोधकाने माहिती क्रम विशिष्ट पद्धतीने दिल्यास माहितीच्या विश्लेषणातून निष्कर्षापर्यंत पोहोचणे संशोधकास सोपे जाते. इंटरनेटच्या माध्यमातून मिळालेले संदर्भ ज्ञान व त्याचे विश्लेषण अद्यावत असल्यामुळे निष्कर्ष सुद्धा अचूक मिळतात. ते उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून प्रमाणशीर मानले जातात. विषया संबंधित एकत्रित करण्यात आलेल्या माहितीचे गुणात्मक विश्लेषण करण्यासाठी संशोधकास खालील सॉफ्टवेअरचा उपयोग होऊ शकतो.

१. मायक्रोसॉफ्ट २. एस.पी.एस.एस. ३. एस.ए.एस. ४. एसप्लस
५. सिसर्टंट ६. मॅटलॅब ७. स्टॅटा ८. आर

संशोधनाच्या अंतिम टप्यामध्ये निष्कर्षाच्या आधारे ऐतिहासिक संशोधनाच्या गुणात्मक वाढीकरिता ऐतिहासिक संशोधक पुढील संशोधनासाठी उपयुक्त विषयांची शिफारस करू शकतो. या दृष्टीकोनातून ऐतिहासिक संशोधनामध्ये इंटरनेटचा संशोधकास होणारा वापर हा अनन्य साधारण आहे. अशाप्रकारच्या ऐतिहासिक संशोधनातून इंटरनेटच्या माध्यमातून विस्तृत प्रमाणात जागतिक पातळीवर इतर अन्य संशोधकांना मार्गदर्शन व समुपदेशन होते. पूर्ण झालेले संशोधन हे इतर संशोधकांना इंटरनेटच्या माध्यमातून सहज उपलब्ध होऊ शकते. हे संशोधन भावी संशोधकांना मार्गदर्शक ठरू शकते.

इंटरनेट व संगणकाचा संशोधनातील वापर खर्चिक असल्यामुळे लघुप्रकल्पाकरिता संशोधकास आर्थिक अडचण निर्माण होते. संगणकास योग्य सूचना न दिल्यास प्राप्त माहितीचे विश्लेषण अचूक येईलच हे खात्रीशीरपणे सांगता येत नाही. त्यामुळे योग्य निष्कर्ष काढण्यास अडथळे निर्माण होतात. त्यामुळे वेळ, श्रम आणि पैसा वाया जाण्याची शक्यता असते. ही ऐतिहासिक संशोधनात संगणकाची मर्यादा आहे. त्यामुळे संशोधक हा आधुनिक तंत्रज्ञान वापरामध्ये पारंगत असणे गरजेचे आहे.

**समारोप :**

ऐतिहासिक संशोधनामधील इटरनेच्या वापराचा विचार करता ऐतिहासिक संशोधन अधिकाधिक अद्यवत बनविण्यासाठी, मुद्देसुद बनविण्यासाठी इंटरनेचा वापर होऊ शकतो. इंटरनेटच्या वापरामुळे संशोधकाचा वेळ, श्रम आणि पैसा वाचतो. ही संशोधनामधील इंटरनेट वापराची उल्लेखनीय बाब आहे. तसेच संगणकावरील किंवा इंटरनेटवरील माहिती घेण्यासाठी संशोधकास अद्यवत ज्ञान असणे गरजेचे आहे. या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये संशोधकास संगणक साक्षर असणे गरजे आहे. अन्यथा अशा संदर्भ साधनांचा वापर करण्यास अडचण येऊ शकते. अशाप्रकारे ऐतिहासिक संशोधनामध्ये इंटरनेट व संगणकाचा अत्यंत प्रभावीपणे वापर होऊ शकतो.



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document certified

Scanned by CamScanner

संदर्भ साधने :

१. शशिकांत बाकरे (१९९८), कॉम्प्युटरचा वाटाड्या, नितीन प्रकाशन, पुणे ३०
२. बी. एम. कऱ्हाडे (२००७), शास्त्रीय संशोधन पद्धती, पिंपळापुरे अँण्ड पब्लिशर्स, नागपूर.
३. सुहास कुलकर्णी व मिलींद चंपारेश्कर (२०११), यांनी घडवलं सहस्त्रक, रोहन प्रकाशन, पुणे.
४. C.R. Kothari (2004) - Research Methodology Methods & Techniques, New Age International Publishers, New Delhi.
५. N. Subramanian (1986) – Introduction To Computers, Tata Mcgraw Hill Publishers, New Delhi.
६. Shrivastava Chetan (2000) – Fundamentals of Information Technology, Kalyani Publishers, New Delhi.
७. Jain V.K. (2002) – Computer programming, Pustakmahal, Delhi.

ICHALKARANJI



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

Scanned by CamScanner

3.3.2 ⑫ (19-20)

Impact Factor - 6.293

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

## Special Issue No.71

## Significance Of Fairs And Festivals In Human Life

**Chief Editor**

**Pramod P. Tandale**

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

| Sr. No. | Name of the Researcher | Title of The Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 112 | प्रा. सौ. लक्ष्मी विष्णु भंडार | विज्ञान, कृषी जीवन व ग्रामीण विकास | 377 |
| 113 | श्री. डी.के. डाके | सिंधुदुर्ग जिल्हयाची सांस्कृतिक परंपरा – एक अभ्यास | 380 |
| 114 | महादेव ज. जाधव | होळी व मोहरम या सणांमधील श्रध्दा आणि अंधश्रध्दा | 382 |
| 115 | सौ.सविता नामदेव नांदवडेकर | हिंदू धर्मातील सण व उत्सव यातील स्त्रियांचे स्थान | 386 |
| 116 | श्रीमती स्मिता रावसाहेब पुजारी | भारतीय सण-उत्सवातील रोजगारसंधी | 390 |
| 117 | डॉ.सर्जेराव पांडुरंग चव्हाण | कोल्हापूर शहरातील माध्यमिक शाळेमधील इ.10 वी च्या विद्यार्थ्यांना सण व उत्सवांचे धार्मिक, सामाजिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्व विकसन करून त्यांच्या अध्ययनावर होणारी परिणामकारकता अभ्यासणे. | 395 |
| 118 | डॉ.सविता अशोक व्हटकर | गौरीच्या गाण्यातील संस्कृती | 398 |
| 119 | डॉ. अपर्णा कुचेकर | हिंदी आदिवासी केंद्रित उपन्यासों में चित्रित पर्व, उत्सव तथा त्यौहार | 401 |
| 120 | प्रा. डॉ. मोहन सावंत | प्रेमचंदके 'गोदान' उपन्यास में कृषक संस्कृति | 404 |
| 121 | वर्षा लिंबराज कांबळे | त्यौहारों के बदलते आयाम | 406 |
| 122 | डॉ. महेंद्रकुमार आ. जाधव | राजपूतों के त्यौंहार और उत्सवों का समाजशास्त्रीय अध्ययन | 410 |
| 123 | डॉ. अे. जी. मगदूम | भारतीय सण - उत्सव आणि कृषी व्यवसाय | 416 |
| 124 | प्रा.डॉ.एकनाथ बाबुराव आळवेकर | 'चैत' कादंबरीतील सण उत्सवाचे चित्रण | 421 |
| 125 | प्रा. वसंत बजरंग भागवत | माहिती जतन व संवर्धनातील ग्रंथालयांची भूमिका | 423 |
| 126 | डॉ. नयना श्रीकृष्ण गायकवाड | सण उत्सव व संस्कृतीचे जतन | 426 |
| 127 | श्री गणेश दादू गायकवाड | आजचे सण, समाज आणि पर्यावरण | 429 |
| 128 | प्रा.हसीना अत्तार | उत्सव का साहित्य में प्रतिबिंब | 432 |
| 129 | प्रा. श्रीदेवी बबन वाघमारे | भारतीय त्यौहारों का मौसम और खानपान से संबंध | 435 |
| 130 | डॉ. कविता अजीतसिंह सुल्हयान | कुंभ मेला- एक धार्मिक महापर्व | 437 |
| 131 | डा. वर्षा गायकवाड | स्वातंत्र्योत्तर हिंदी उपन्यासों में मेले और त्यौहार | 440 |



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

# 'चैत' कादंबरीतील सण उत्सवाचे चित्रण

प्रा.डॉ.एकनाथ बाबुराव आळवेकर,

डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी

'चैत' ही द.तु. पाटील यांची कादंबरी मौज प्रकाशन गृह, मुंबई यांनी २०१८ साली प्रसिध्द केली. ग्रामीण जीवनानुभव मांडणा–या या कादंबरीत कोल्हापूर परिसरातील एका खेडेगावच्या यात्रेसंबंधीचे कथानक येते. यात्रेची पूर्वतयारी ते यात्रेची सांगता या अवकाशामध्ये कादंबरी सामावली आहे. 'चैत' या कादंबरीच्या शिर्षकातून 'यात्रा', कोल्हापुरी बोलीत 'महाई' हा अर्थ अभिप्रेत आहे. चैत्र महिन्यानंतर खेडयातील यात्रांना सुरूवात होते त्यावरून यात्रेसाठी चैत किंवा 'महाई' असे म्हटले जाते.

'चैत' कादंबरीत गुढीपाडव्याच्या सणानंतर गावात चैत साजरा होणार असतो. गावसभा होऊन चैताचा दिवस ठरतो. गावातील ग्रामदैवताचा उत्सव चैत म्हणून साजरा होतो. बाळुबाचा चैत रविवारीच होणार असे गावसभा घेऊन ठरविले जाते. चैतासाठी पैशाचे नियोजन करण्यात प्रत्येकजण गुंतलेला असतो. चैत म्हटले की देवासाठी नैवद्य म्हणून पुरण पोळीचा गोड जेवणाचा दिवस आणि दुसऱ्या दिवशी पै पाहुण्यांसाठी मांसाहारी जेवणाचा बेत असतो. चैतासाठी बकरे, नवी कपडे यावर होणारा प्रमुख खर्च असतो. 'आजचा दिवस उद्या येत नाही' असे म्हणून प्रत्येकजण प्रसंगी कर्ज काढून चैत साजरा करण्याच्या तयारीत असतो.

'चैत' कादंबरीत रामूनाना, पत्नी हौसाकाकू, मुलगा तानाजी लग्न झालेल्या तीन मुली असे कुटुंब आहे. रामूनाना अल्पभूधारक शेतकरी असून कधी कधी पती-पत्नी रोजगाराला जातात तर तानाजी ऊस हंगामात दुसऱ्याच्या फडात काम करून कुटुंबाला हातभार लावतो. रामूनानासुध्दा चैतासाठी डेअरीतून दीड हजार, तानाजीच्या ऊसतोड कंत्राटदाराकडून एक-दिड हजार, रोजंदारीवरील ॲडव्हान्स, भात विकून मिळालेले पैसे अशी पैशाची जुळवाजुळव करतो.

चैताचा दिवस जवळ देईल तशी सर्वांची शेतातील, घरातील कामे उरकून घेण्याची घाई सुरू होते कपडयांची खरेदी, दळप, कांडप, चटणी करणे. सणावाराला उधार माल देणारा दुकानदार आणि तिथला ग्राहक हे नाते वर्षानुवर्षे अबाधित असलेले कादंबरीतून पहायला मिळते. हौसाकाकू लेकींना केळीची शिदोरी देऊन यात्रेसाठी बोलावून घेते.

चैताच्या आदल्या दिवशी गावात बकऱ्यांचा बाजार भरतो. प्रत्येक कुटुंब आपल्या पै पाहुण्यांच्या बेरजेवर बकरे खरेदी करतो. दुपारच्यापुढे बकऱ्यांची जागा फिरत्या विक्रेत्यांनी घेतली. दुकानगाळे, पाळणेवाले यांनी मांडामांड केली. चैताचे वातावरण अधिक फुलायला सुरवात होत असल्याचे चित्र कादंबरीकाराने उभे केले आहे. जागतिकीकरणाचा प्रभाव यात्रेवर झाल्याचे चित्रण केले आहे. चैताला शुभेच्छा देणारे डिजीटल बोर्ड, स्वागत बोर्ड चौकाचौकात, तिकटीवर झळकले, जीप ट्रॅक्टर, कारगाडया, मोटरसायकली यांतून माणसं यात्रेला येत होती.

रात्रीचे बारा वाजल्यानंतर बकरी कापणे सुरू होते. मीठ घातलेली परात, अगरबत्ती, पाण्याचा तांब्या या वस्तू बकऱ्याबरोबर येऊ लागल्या यातून गावची, प्रथा परंपरा समजते.
नैवेद्य, नारळ घेऊन माणस बाळुबांच्या दर्शनाला जात होती. बैलांचे गाडे निघत होते. प्रत्येक घरात जेवणावळी उठत होत्या. जत्रेनिमित्त पै.पाहुण्यांना जेवायला बोलविण्यामुळे त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टींची विचारपूस, ऋणानुबंधाची जपणूक ही माणस कशी करतात. हे ध्यानात येते. खेडयातील हा आपलेपणा, नाती टिकविण्याची क्षमता त्यांच्यातल्या संस्कृती संस्काराचा एक भाग म्हणावा लागेल. आधुनिक काळात नात्यातील बंध अनेक कारणांनी विरळ होत असताना जत्रा, सण, उत्सव, नात्यातील सामूहिक कार्यक्रमामुळे नात्यांची वीण अधिक घट्ट होताना आढळते.

यात्रेच्या दोन-तीन दिवसातील खास आकर्षण म्हणजे तमाशाचा फड आणि कुस्त्यांचे मैदान. गावातील आणि पाहुणे मंडळी रात्रीच्या तमाशांचा आनंद घ्यायला जातात. तमाशाचा नारळ फोडण्याचा मान सरपंचाचा असतो. दुसरा दिवस शिळ्या चैताचा असतो. चैताच्या दिवशी न आलेले पाहुणे दुसऱ्या दिवशी शिळ्या चैताला येतात. दुपारी कुस्त्यांचा फड असतो. कुस्त्यांच्या फडात मोजकेच पैलवान असतात. आजकाल तालमीत जाणाऱ्या पोरांची संख्या कमी झालेली आहे. तालमीत आता पत्त्यांचा डाव चालू झाला होता. खेडयातल्या या बदलाचे चित्र कादंबरीकाराने रेखाटले आहे. थोडक्यात, चैताच्या निमित्ताने जेवणावळी, तमाशा, पाळणे, खेळणी, कुस्त्या, आईस्क्रिम, कुल्फि यामध्ये आनंद शोधणारी ही गावची माणस असतात.

सण, उत्सव, यात्रा म्हणजे आनंदाची पर्वणी मानणारी ही खेडयातील माणसं गोतावळयात सुख मानतात. यात्रा, सणासुदीचे दिवस म्हणजे माहेरवाशीणींसाठी विरंगुळयाचे क्षण असतात. ते विरंगुळयाचे क्षण हौसाकाकूंच्या लेकींच्या वाटयाला येतात. सासरचा विसर पडून माहेरात रमणाऱ्या या लेकी स्वतः आनंदी राहून आई-बापालाही आनंदी ठेवतात. हे या यात्रेच्या वातावरणातून पहायला मिळते. एका छोटया गावातल्या यात्रेच्या वातावरणाने भारलेली ही कादंबरी आहे.

कादंबरीत प्राध्यापक असलेले जनक नावाचे पात्र असून तो थोडा पुरोगामी, आधुनिक विचाराचा आहे. चैतासाठी जनककडे आईने पाच हजार रूपये मागितले होते ते पत्नीस न समजता तो आईकडे देतो. चैताच्या निमित्ताने होणारी पैशाची उधळपट्टी त्याला मान्य नसते. जनकचे विचार गावातल्या लोकांना पटत नव्हते. नोकरदार आणि गावातील माणस यांच्यातला वैचारिक संघर्ष कादंबरीतील काही प्रसंगातून आलेला आहे. जत्रा, यात्रा, उरूस, सण, उत्सव यांचे ओंगळवाणे स्वरूप, डामडौल करण्यासाठी कर्ज काढणे, बकर कोंबड मारणे, दारू पिणे, श्रध्दा-अंधश्रध्दा या गोष्टींवर भाष्य करणारा जनक कादंबरीत पहायला मिळतो. यात्रेतील डिजीटल बोर्ड, ...

Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

आश्चर्य वाटते. खेडयातल्या लोकांच्या अश्चर्याची आणि गरिबीची त्याला चिंता वाटते. ज्यांनी कर्ज काढून सण करण्याची पध्दत त्याला खटकते. मनोरंजनाची साधन नसल्याच्या काळात चैत ठिक. होता पण आता तो काळ राहिलेला नव्हता असे त्याची म्हणणे असते. यात्रेनिमित्त निघालेला 'लोकप्रबोधन' पेपरचा अंक यात्राविशेषांनी भरलेला पाहून त्याला राग येतो. नाव 'लोकप्रबोधन' पण जत्राच समर्थन बकऱ्यांच्या कत्तलींचा उदो उदो या गोष्टी त्याच्या मनाला पटत नव्हत्या. जाहिरातींच्या पैशासाठी त्या प्रथांचे वैभवीकरण करणे त्याला पसंत नव्हते.

गावातल्या एस.टी. स्टँडवर दामू मिसाळच्या खोक्याजवळ दारूच्या बाटयांचा ढिग पडलेला जनकला दिसतो. 'गावाला प्यायला पाणी जेवढ लागत नाही तेवढी दारू लागतीया' हा गावचा पराक्रम दामून जनकला सांगितल्यावर यात्रा, लग्न, उत्सव यानिमित्ताने उधळपट्टी करणारा हा 'खेडयातला समाज कधी सुधारणार' असा प्रश्न पडतो.

यात्रा संपते हौसाकाकूच्या लेकी आपल्या आपल्या सासरी निघतात. लेकी आल्यामुळे हौसाकाकूला कामातून सवड मिळाली होती. जाताना तिघी लेकींना हातात काकण घालायला सांगते त्यांना चटणी, पापड, सांडगे बांधून देते. लेकींना पोहचवायला हौसाकाकू एस.टी. स्टँडपर्यंत जाते. लेकी गेल्यावर हौसाकाकूला घर सुनसुन वाटत.

'चैत' कादंबरीतील प्रत्येक प्रसंग, पात्रे ग्रामीण वातावरणात मुरलेले वाटतात. गुढीपाडवा, त्यादिवशी लिंब, गुळ खाणे, यात्रेची तयारी, यात्रेसाठी पैशांची जुळवाजुळव करणे, माहेरवाशीर्नींना शिदोरी देणे, बकऱ्यांचा बाजार, खेळणी, पाळणे, कळकट, मळकट कपडयातील आईस्क्रि म, कुल्फी विक्रे ते, बैलांच्या गाडयांची मिरवणूक, मटणाच्या जेवणाच्या पंक्ती, पाहुण्यांची विचारपूस प्रत्येकाचे गोतावळयात रमणे, माहेरवाशीनींचा परतीचा प्रवास. या सर्व बाबी कादंबरीकाराने चित्रमय पध्दतीने रंगविल्या आहेत.

थोडक्यात, 'चैत' कादंबरीतील सण-उत्सवाचे चित्रण करणारे कथानक, मोजके प्रसंग पात्रे, कोल्हापुरी बोलीचा प्रभावी वापर, निवेदनातील चिंतनात्मकता अशी कादंबरीची वैशिष्टये आढळतात.

**संदर्भ :**

१.पाटील द.तु. :- 'चैत', मौज प्रकाशनगृह मुंबई, २०१८

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI
Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )
ISSN No. 2319-6025
(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)
वर्ष–आठवे : अंक सतरा–अठरा
जानेवारी–फेब्रुवारी–मार्च, एप्रिल–मे–जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

संपादक
डॉ. शिवकुमार सोनाळकर

कार्यकारी संपादक
डॉ. नीला जोशी

संपादक मंडळ
डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे

संपादन सहाय्य
प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे

सल्लागार समिती
डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी

प्रकाशक
अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

मुद्रक
भारती मुद्रणालय
८३२ ई वॉर्ड, शाहुपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ३००/–



DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI
Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

परिश्रमाला आता चांगलंच यश आलं. मराठी भाषा, साहित्य संस्कृती यांचं संवर्धन आणि विकसन करणारी महाराष्ट्रात अग्रेसर असलेली ही संस्था आहे.

आजच्या काळात साहित्याची विविध अंगाने चर्चा होताना दिसते. आपल्या समाजजीवनात पूर्वीपासून आजपर्यंत श्रम करणाऱ्या लोकांची संख्याही विलक्षण आहे. श्रमसंस्कृती हा समाजजीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. श्रमसंस्कृती शब्द तसा व्यापक आहे. श्रम आणि संस्कृती या दोन संकल्पना त्यात येतात. 'श्रम म्हणजे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष मोबदल्याच्या अपेक्षेने केलेली शारीरिक किंवा बौद्धिक स्वरूपाची कृती'. श्रम करणाऱ्या व्यक्ती म्हणजे श्रमिक. श्रमाचा संस्कार हा संस्कृतीचाच एक भाग आहे. 'श्रम करणाऱ्या लोकांचे जगणे, दुखणे, खुपणे, त्यांचे भावविश्व, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक पर्यावरणासहीत अंतर्भूत होते त्याला 'श्रमसंस्कृती' असे म्हणतो. शेतकरी, शेतमजूर, बलुतेदार, दलित, पारंपरिक व्यावसायिक, कारागीर, फिरस्ते, पोटासाठी श्रम करणारे कलावंत, अल्पसंख्यांक लोक, स्त्रिया हे परंपरागत चालत आलेले श्रमिक आहेत.

औद्योगिक क्रांतीनंतर कामगार, गिरणीकामगार, विडीकामगार, हमाल, भंगी, रेल्वे, रिक्षा, टॅक्सी ड्रायव्हर, गॅरेजमधील मॅकेनिक, वेटर, रोजगार हमीवरील कामगार, बांधकाम क्षेत्रातील लोक, घरगडी, डबेवाले लोक, धुणीभांडी, स्वयंपाक करणाऱ्या स्त्रिया यांचाही श्रमिक वर्गात उल्लेख करता येईल. २१ व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या विश्वामध्ये पोटासाठी वेगवेगळे व्यवसाय, उद्योग, लघुउद्योग, नोकरी करणारे लोक, बौद्धिक कष्ट करणारे लोक, कारकून, कंपन्यांमध्ये काम करणारे लोक यांचा समावेश होतो. या सर्वच स्तरांतील श्रमिक लोकांची संस्कृती, जीवनपद्धती, जीवनसंघर्ष साहित्यामध्ये चित्रित झालेला आहे. पण श्रमसंस्कृतीच्या अंगाने त्याकडे पाहणे गरजेचे आहे. जात्यावरील ओवी आणि मोटेवरील गाणी अशा मौखिक परंपरेपासून ते एकविसाव्या शतकातील कार्पोरेट दुनियेच्या लोकांच्या श्रमसंस्कृतीचे दर्शन साहित्यामध्ये विविधांगाने आल्याचे दिसते. श्रमसंस्कृतीच्या अंगाने ते कसे झालेले आहे, हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

या चर्चासत्रासाठी एकूण १३२ शोधनिबंध आले. संशोधकांनी संस्कृती आणि साहित्य या विषयावर सखोल मांडणी केली ती टाळावी म्हणून निबंधात काटछाट करावी लागली; पण आपणा सर्वांच्या प्रयत्नातून हा अधिवेशन विशेषांक उत्तम झाला आहे. आपणा सर्वांच्या पसंतीस उतरेलच. या विशेषांकासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. बाबासाहेब पाटील, गोकुळच्या संचालिका सौ. अनुराधा पाटील, शाहूवाडी-पन्हाळ्याचे आमदार सत्यजित पाटील, श्री. युवराज पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष श्री.बाळासाहेब इंदुलकर, तज्ज्ञ संचालक डॉ. बी. आर. गाडवे, प्रभारी प्राचार्य डॉ. जी. एच. आळतेकर, समन्वय समितीतील आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच शिविमच्या डॉ. नीला जोशी, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश पाटील, डॉ. दिनेश वाघुंबरे, डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. संजय पाटील, डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. मांतेश हिरेमठ, प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे यांच्या प्रयत्नातून हा अंक समृद्ध झाला. तसेच भारती मुद्रणालयाचे निहाल शिपूरकर आणि त्यांचे सर्व कर्मचारी यांचेही मनःपूर्वक आभार !

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**
संपादक

Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

 ISSN No. 2319-6025

# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| अध्यक्षीय मनोगत... | डॉ. शिवाजी विष्णू पाटील | ८ |
| श्रमसंस्कृती, साहित्य आणि बांधिलकी | डॉ. अनिल गवळी | १३ |
| ग्रामीण कष्टकरी स्त्रीचे चित्रण | एकनाथ पाटील | १८ |
| श्रमसंस्कृती आणि गोमंतकीय मराठी साहित्य | डॉ. विद्या प्रभुदेसाई | २७ |
| श्रमसंस्कृती आणि कोकणी साहित्य | डॉ. महेश स. बावधनकर | ३३ |
| सीमाभागातील श्रमसंस्कृती आणि साहित्य | डॉ.शिवाजीराव पाटील | ४२ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण साहित्य | डॉ. यशवंत चव्हाण | ४८ |
| श्रमसंस्कृती आणि भटक्याविमुक्तांचे साहित्य | डॉ. बाळासाहेब संतू चव्हाण | ५३ |
| श्रमसंस्कृती आणि स्त्रीवादी साहित्य | डॉ. लता पांडुरंग मोरे | ६६ |
| श्रमसंस्कृती आणि दलित साहित्य | डॉ. चंद्रकांत शंकर कांबळे | ७० |
| श्रमसंस्कृती आणि आदिवासी साहित्य | प्रा. डॉ. दीपककुमार वळवी | ७७ |
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कष्टकरी स्त्री | डॉ.मानसी जगदाळे | ८१ |
| श्रमसंस्कृती आणि महानगरीय कविता | तेजस चव्हाण | ८७ |
| मधउत्पादक श्रमजीवी | श्री. दत्ता मोरसे | ९३ |
| भारतीय श्रमसंस्कृती आणि मराठी श्रमगीत परंपरा | प्रा. अनंता कस्तुरे | ९७ |
| नोकरी, व्यवसाय, करिअर करणारी स्त्री | प्रा. डॉ. शिवकुमार सोनाळकर | १०७ |
| महादेव मोरे : श्रमिक साहित्याचा आधारस्तंभ | प्रा. डॉ. रमेश पोळ | ११२ |
| खोत व दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी | डॉ. एकनाथ आळवेकर | ११६ |
| महादेव मोरेंच्या साहित्यातील विडी कामगार | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील | १२० |
| मराठी स्त्रीगीते आणि श्रमसंस्कृती | डॉ. नीला जोशी | १२३ |
| 'कुळंबीण' : शेतकरी स्त्रीच्या श्रमाचे चित्रण | डॉ. आनंद वारके | १२७ |
| जागतिकीकरण आणि मराठी कादंबरीतील श्रमिक | डॉ. प्रकाश दुकळे | १३० |
| महात्मा बसवण्णांचा श्रमसिद्धांत : 'कायकवे कैलासा' | डॉ. मांतेश हिरेमठ | १३३ |
| मराठी नाटकातील श्रमजीवींचे चित्रण | प्रा. डॉ. दत्ता पाटील | १३७ |
| म. फुले यांच्या साहित्यामधील श्रमिकांचे चित्रण | डॉ. अरुण शिंदे | १४३ |
| नारायण सुर्वे यांच्या कवितेतील कामगारविषयक जाणिवा | डॉ. शिवलिंग मेनकुदळे | १४६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील कामगार | प्रा. डॉ. शिवाजी महादेव होडगे | १५१ |


ISSN No. 2319-6025 

# कृष्णात खोत आणि कैलास दौंड यांच्या कादंबरीतील शेतकरी

डॉ. एकनाथ आळवेकर
मराठी विभाग प्रमुख, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी

## प्रास्ताविक

१९९० नंतरच्या कालखंडातील मराठी ग्रामीण कादंबरी लेखकात कृष्णात खोत आणि कैलास दौंड यांचा महत्त्वपूर्ण उल्लेख करावा लागेल. त्यांच्या कादंबऱ्यांतून वंचित म्हणून आलेला घटक म्हणजे शेतकरी होय. कृष्णात खोत हे पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या, समाजजीवनाच्या समस्या मांडणारे लेखक आहेत तर कैलास दौंड हे मराठवाडा परिसरातील शेतीप्रश्न आणि समाज- संस्कृतीबद्दल मांडणी करतात. म्हणूनच १९९० नंतरच्या कालखंडातील कादंबऱ्यांतील शेतकऱ्यांचे चित्रण यांविषयी मांडणी करताना कृष्णात खोत यांच्या 'झड-झिंबड', 'धुळमाती' आणि 'रिंगाण' तसेच कैलास दौंड यांच्या 'कापूसकाळ' या कादंबऱ्यांचा प्रस्तुत लेखात विचार केला आहे.

कृष्णात खोत यांनी 'गावठाण', 'रौंदाळा', 'झड-झिंबड', 'धूळमाती', 'रिंगाण' या कादंबऱ्यांतून कोल्हापूर परिसरातील शेती, समाज, निसर्ग, राजकारण, संस्कृती यावर भाष्य केले आहे. 'झड-झिंबड' या कादंबरीमध्ये पाऊस आणि शेतकरी यांच्यामधील संघर्ष दाखवला आहे. माणसाला जीवदान देणारा पाऊस माणसाच्या जीवावर उठतो. पाऊस आणि माणसातील ताणतणाव लेखकाने कादंबरीतून चित्रीत केला आहे. अतिवृष्टिमुळे होणारे नुकसान कोल्हापूर परिसरातील शेतकऱ्याला नवीन नाही म्हणून कादंबरीतील भिका म्हणतो, 'यका घटकंत पडायला लागला तर पिरतीमीला बुडवील' ('झड-झिंबड' पृ.७). 'झड-झिंबड' मध्ये पावसाचे रणकंदन पाहायला मिळते. पावसाने प्रचंड नुकसान झाले आहे. नाना पांगेच्या केळी जमीनदोस्त झाल्या. येसबा पाटलांची कलमी आंब्याची झाडं मोडून पडलीत. ओढ्यातील प्रचंड पाण्यामुळे शेतजमीन वाहून गेली. बैलासह शेतकरी वाहून गेला. पांडू शिंदे शेतातल्या घराभोवतीनं पाण्यानं वेढल्यानं अडकून पडतो. अनेकांची घरं पडून नुकसान होतं. गुराढोरांना वैरण मिळत नाही. वाळवंकराच्या शेरडास्नी बुळकांडी लागते आणि ती मरतात. गावातल्या किराण दुकानातल्या वस्तू संपल्या. आजारी पडलेल्या माणसांना द्यायला डॉक्टरकडली औषधं संपलीत. गावाला पुराच्या पाण्याने वेढल्याने गाव एकाकी पडले.

पावसानं शेतकऱ्यांचं, त्यांच्या शेतीमातीचं, घराचं नुकसान झालं आहे. पाऊस वैरी झाल्याची भावना छोट्याशा गावातील माणसं व्यक्त करतात. अशा परिस्थितीत खेड्यातील मानवता उपयोगी पडते. वंचित म्हणून संकटे झेलणाऱ्या शेतकऱ्याला त्याचा शेजारी-पाजारीच उपयोगी पडतो. शासकीय पातळीवरील मदतीपासून तो शेतकरी कोसो दूर असतो. जनावरांची वैरण वाटून घेतात. घरातलं पीठ, तांदूळ एकमेकांना वाटून खातात. पाऊस, पूर ओसरल्यावर नुकसानीचे पंचनामे होतात पण त्यातही भ्रष्टाचार आड येतो. वंचितांचे दुःख सुसह्य होण्यापेक्षा असह्य होते. वंचित म्हणून वेदना सहन करणाऱ्या शेतकऱ्यांविषयीचे कृष्णात खोत यांनी 'झड-झिंबड' मधून चित्रण केले आहे.


ISSN No. 2319-6025

'धूळमाती' या कादंबरीमध्ये जमीनदार आणि शेती कसणारा घटक म्हणून कूळ या दोघांतल्या तणावाचे चित्रण येते. ग्रामीण भागात प्रत्यक्ष शेतात राबणारा पण भूमिहीन म्हणून असणारा वर्ग आहे. गावातला जमीनदार आपली शेती अनेक कुळांना शेती कसण्यास देतो. जशा जमीन मालकाच्या पिढ्या असतात तशा कुळांच्यादेखील पिढ्या असतात. पिढ्यान्‌पिढ्या वंचित राहिलेला, कष्ट करणारा घटक म्हणून कुळाकडे पाहाता येईल.

कादंबरीतील दादाकडे गावातल्या दाजीचा नारगुंडीचा माळ अनेक वर्षे कसायला असतो. मुलाच्या नोकरीसाठी पैसे भरायचे असल्याने दाजीने नारगुंडीचा माळ विकायला काढलेला असतो. दाजीच्या आईनं दाजीला सांगितलं होतं, 'त्यास्नी लय श्यात न्हाई तवा कुठंबी चार काकऱ्या दे' (धूळमाती, पृ.२४). आईच्या शब्दाला जागून दाजीनं तो माळ विकत घ्यायचा आग्रह केला. पण दादाची फसवणूक करून दाजी गावातल्या बन्याबापूला रान विकतो. दादाची फसवणूक करतो. या घटनेमुळे दादाच्या सर्व कुटुंबाची अवहेलना होते.

दादांच्या सगळ्या कुटुंबानं दाजीच्या रानात कष्ट केलं होतं. बारा महिने राबून कुळाला खळ्यावरचा निम्मा भागच घराकडं न्यावा लागतो. त्याग आणि कष्टातून कुळाला केवळ कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कुळपद्धतीने राबावे लागते. दादाच्या कुटुंबानं नारगुंडीच्या माळावर मेहनत करून सोनं पिकवलं होतं. त्या कुटुंबाच्या कष्टाची जाण न राखता केवळ पैशाच्या हव्यासापोटी दाजी रान दुसऱ्याला विकतो. जमीनदार आणि कुळाचे पूर्वीच्या काळातले जिव्हाळ्याचे ऋणानुबंध आणि आताच्या काळातील केवळ मालक आणि श्रमिक म्हणून उरलेले संबंध यावरही कृष्णात खोत यांनी 'धूळमाती' च्या निमित्ताने प्रकाश टाकला आहे. दाजीने दादावर केलेला अन्याय गावातील माणसांना पसंत नसतो. दाजीनं हातोहात फसवल्याने दाजीबद्दलच्या रागानं दादाचं कुटुंब पेटते. दादाचा थोरला मुलगा आण्णाच्या तळपायाची आग मस्तकात जाते. दादाच्या पत्नीला हे सहन करण्यापलीकडचे असते. धाकटा मुलगा राजबाने बँकेतून कर्ज काढून, पै-पाहुण्यांकडून हातउसने पैसे आणलेले असतात. कादंबरीत जमीन मालकाचा विजय होतो तर कूळ म्हणून दादा मात्र प्रामाणिक कष्ट करूनही वंचित राहतो.

कृष्णात खोत यांनी 'रिंगाण' या कादंबरीतून धरणग्रस्त शेतकऱ्याची शोकांतिका मांडली आहे. ही कादंबरी 'तुटलेल्या मुळांच्या कोंबाना' अर्पण केली आहे. 'रिंगाण' या कादंबरीतला नायक देवाप्पा हा धरणग्रस्त आहे. विस्थापित देवाप्पाचे कुटुंब मूळ ठिकाणापासून लांबच्या प्रदेशात जाते. सरकारनं धरणग्रस्तांना वेगवेगळ्या ठिकाणी वस्तीला जागा आणि शेत दिले. देवाप्पाच्या कुटुंबालाही एका गावात वस्तीला जागा आणि शेत सरकारकडून मिळते. उचले म्हणून आलेल्या देवाप्पाच्या कुटुंबाला त्या परक्या गावात वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागते. नव्या गावात राहताना ती माणस त्यांना रुजू देत नव्हती. देवाप्पाला सरकारकडून मिळालेल्या शेतातील हरभरा चोरीस जातो. उलट त्यांच्यावरच चोरीचा आळ घेतला जातो. देवाप्पाच्या आईला ही कापडातली माणसं कुणाचीच नसतात असे वाटते. मूळ शेतकरी असलेल्या या देवाप्पाच्या कुटुंबाला प्रस्थापित - विस्थापित संघर्षाला तोंड द्यावे लागते.

ISSN No. 2319-6025


Signature Not Verified
SHAHAJAHAN
MEHABUB MANER
Document Certified

डोंगरकपारीत राहणारा देवाप्पा हा छोटा शेतकरी, धरणग्रस्त म्हणून विस्थापित होऊन परक्या ठिकाणी जाताना सगळी जनावर बरोबर नेऊ शकत नव्हता. त्यातल्या दुभत्या नसलेल्या म्हशी तिथंच जंगलात सोडून दिल्या होत्या. सोडून आलेली ढोरं दुभती झाल्यात हे समजल्यावर देवाप्पा आपल्या मुदीवाल्या म्हशीला दावं लावून आणण्यासाठी मूळवस्तीकडे जंगलात जातो. म्हसरांना, रेडकांना नेऊन विकून पैसे करायचे असे देवाप्पासह सर्वांना वाटते. अल्पभूधारक पण विस्थापित झालेल्या या शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती यावरून ध्यानात येते. दूधदुभत्यांच्या जोडधंद्यावर जगणारा हा श्रमिकवर्ग आहे.

पण एका अपेक्षेने गेलेल्या देवाप्पाला तिथल्या म्हशी हुलकावणी देतात. त्याच्याशी ओळखही दाखवत नाहीत. देवाप्पाच्या म्हसरांनी सगळ्या जंगलभर हिंडवत देवाप्पाला दावणीला बांधून फिरवलं. देवाप्पाला हद्दीपर्यंत पाठलाग करून हद्दीपार करून पळवून लावतात. कादंबरीतील देवाप्पाचा शेवटी पराभव होतो. देवाप्पाची तुटकी मूळ रुजविण्याची धडपड व्यर्थ होते, याचे चित्रण येते.

यानंतर कैलास दौंड या महत्त्वपूर्ण कादंबरीकाराचा विचार केला आहे. कैलास दौंड हे मराठवाडा-विदर्भातील शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन पुढे आलेले लेखक आहेत. त्यांनी 'कापूसकाळ' ही कापूसउत्पादक शेतकऱ्यांवर आधारित कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये कापसाचे उत्पन्न, कापूस वेचायचा प्रश्न, कापसाला मिळणारा भाव, कापूस उत्पादक शेतकऱ्यांची होणारी अडवणूक, फसवणूक इत्यादी गोष्टींकडे लक्ष वेधले आहे. विदर्भ-मराठवाड्यातल्या शेतकऱ्याला अवर्षणाचा सामना करावा लागतोच. त्याचबरोबर शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या बाजारभावासाठी झट्याझोंब्या खाव्या लागतात. इथला शेतकरी सुद्धा निसर्ग आणि शासनाकडून वंचित राहिला आहे.

'कापूसकाळ' मधील जगू हा कापूस उत्पादन करणारा मध्यमवर्गीय शेतकरी शेतात पिकलेला कापूस फेडरेशनला विकतो. पण त्याला वेळेवर पैसे मिळत नाहीत. स्वत: जगू बायकोला घेऊन कापूस वेचतो. भाड्याच्या ट्रॅक्टरमधून कापूस नेऊन महिनाभर फेडरेशनच्या दारात थांबावे लागते. व्यापाऱ्यांचा कापूस मात्र भ्रष्ट मार्गाने वजनकाट्यावर जातो. हे शेतकऱ्यांना सहन होत नाही. इथे शेतकऱ्याला मिळणाऱ्या दुजाभावाचे वर्णन येते. परिस्थितीमुळे शेतकऱ्याला नुकसान सोसावे लागते. गाडीभाडं देण्यासाठी रखमाला स्वत:चा कापूस कमी किमतीत विकावा लागतो. बैलगाडीतून कापूस विकायला गेलेल्या मोहनचा बैल चारा-पाण्यावाचून पाय सडून मरून जातो. फेडरेशनमध्ये अचानक कापूस पेटतो आणि मग कापूस खरेदी बंद होते. दुसऱ्या फेडरेशनला कापूस विकत घेण्यासाठी शेतकऱ्याला बाजार समितीच्या लोकांच्या पाया पडावे लागते. कादंबरीतील सुशाबाई लहान लेकराला सोबत घेऊन कापूस वेचणीला जाते. ताप आलेल्या पोराला डॉक्टरकडे नेण्यासाठी बाजारात थोडा कापूस विकते. अंगावरचं पाताळ फाटलेलं असतं. पै-पाहुण्यांच्या लग्नकार्याला जावे लागणार लागते. म्हणून कापूस विकून पैसा लवकर मिळावा, असे तिला वाटते. सुशाबाईच्या दुःखातून शेतकरी स्त्रीची वेदनाही लेखकाने कादंबरीतून मांडली आहे. थोडक्यात, कैलास दौंड यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा अत्यंत परिणामकारकरीतीने मांडली आहे.


ISSN No. 2319-6025

**समारोप**

कृष्णात खोत यांच्या 'झड-झिंबड', 'धूळमाती' आणि 'रिंगाण' तसेच कैलास दौंड यांच्या 'कापूसकाळ' या कादंबऱ्यांमधून जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी वंचितांचे दु:ख घेऊन जगत असतो याचे चित्रण येते. श्रम करून पोट भरणे एवढीच त्यांची आयुष्यभर धडपड असते. निसर्ग आणि मानवाकडून येणाऱ्या संकटाचा तो सामना करीत असतो. या वंचितांना करावा लागणारा संघर्ष या लेखकद्वयांनी अत्यंत गंभीरपणे रेखाटला आहे.

**संदर्भ**

१. खोत कृष्णात, 'झड-झिंबड', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई २०१३
२. खोत कृष्णात, 'धूळमाती', मौज प्रकाशन, मुंबई २०१४
३. खोत कृष्णात, 'रिंगाण', शब्द पब्लिकेशन, मुंबई २०१८
४. दौंड कैलास, 'कापूसकाळ', मीरा बुक्स ॲण्ड पब्लिकेशन, औरंगाबाद २००९

◆

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI

Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

ISSN No. 2319-6025

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal)

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

वर्ष–आठवे : अंक सतरा–अठरा

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च, एप्रिल–मे–जून २०१९

## श्रमसंस्कृती आणि साहित्य

संपादक

डॉ. शिवकुमार सोनाळकर

कार्यकारी संपादक

डॉ. नीला जोशी

संपादक मंडळ

डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे

संपादन सहाय्य

प्रा. प्रकाश नाईक, प्रा. रघुनाथ मुडळे

सल्लागार समिती

डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी

प्रकाशक

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

मुद्रक

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. ३००/–

KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI DATTAJIRAO ICHALKARANJI

Signature Not Verified
SHAHAJAHAN
MEHABUB MANER
Document Certified

| | |
|---|---|
| श्रमसंस्कृती आणि ग्रामीण कविता | डॉ.अशोक सदाशिव तवर ............ १५३ |
| शेतकऱ्यांचे लढे आणि ग्रामीण कादंबरी | प्रा. डॉ. सौ. कांचन नलावडे ......... १६० |
| अनिल अवचट यांच्या साहित्यातील श्रमजीवन | डॉ. सुरेश बाळकृष्ण शिंदे............. १६६ |
| धनगर समाजातील श्रमसंस्कृती | डॉ. तानाजी ज्ञानदेव पाटील .......... १७० |
| 'आम्ही काबाडाचे धनी'तील कष्टकरी | प्रा. सुभाष वाघमारे.................... १७३ |
| श्रमसंस्कृती आणि बहिणाईंची गाणी | डॉ. सुवर्णा नामदेव पाटील............ १७७ |
| कामगार रंगभूमीवरील श्रमिक | डॉ. आनंद शामराव बल्लाळ........... १८१ |
| तथागत बुद्ध आणि श्रमसंस्कृती | डॉ. प्रशांत बाबासो गायकवाड........ १८५ |
| सुर्वेंची कविता : श्रमिक जीवनाचा दस्तऐवज | डॉ. अशोक शेलार .................... १९० |
| दलितांच्या श्रमाचे चित्रण | प्रा. डॉ. नितीश पांडुरंग सावंत ........ १९३ |
| ग्रामसंस्कृती आणि श्रमसंस्कृती : सहसंबंध | प्रा. डी. जे. दमामे .................... १९६ |
| जनाबाईंचे अभंग आणि श्रमसंस्कृती | डॉ. धनंजय होनमाने.................. १९९ |
| मराठी कवितेतील शेतकरी व शेतमजुरांची श्रमसंस्कृती | डॉ. भरत जाधव........................ २०२ |
| श्रमिक साहित्य आणि साम्यवाद | डॉ. हणमंत रामचंद्र पोळ ............. २०५ |
| अवैदिकांची श्रमसंस्कृती आणि श्रमप्रतिष्ठा | डॉ. महेश गायकवाड .................. २०८ |
| अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील श्रमसंस्कृती | डॉ. सविता अशोक व्हटकर .......... २११ |
| आदिवासी कादंबरीतील भिल्ल ज़मातीचे श्रमचित्रण | प्रा. विनायक राऊत .................. २१४ |
| इंद्रजित भालेरावांच्या कवितेतील शेतकरी, शेतमजूर | प्रा.डॉ. सुजय बाबूराव पाटील ........ २१७ |
| भास्कर चंदनशिव यांच्या साहित्यातील श्रमसंस्कृती | प्रा. राजश्री बिसुरे...................... २२० |
| महादेव मोरे यांच्या कादंबरीतील श्रमिकांचे चित्रण | डॉ.विनोद राठोड ..................... २२३ |
| नारायण सुर्वे : कामगार साहित्याची 'सनद' | सौ. शीतल सचिन गोर्डे-पाटील ...... २२६ |
| नारायण सुर्वेंच्या कवितेतील श्रमिकांचा जीवनसंघर्ष | डॉ. अशोक नामदेव शिंदे............. २२९ |
| धम्मपाल रत्नाकरांच्या साहित्यातील हॅटिल कामगारांचे चित्रण | डॉ. सर्जेराव पद्माकर.................. २३२ |
| मराठी कथेतील ग्रामीण, कष्टकरी स्त्रीचे चित्रण | प्रा. संतोषकुमार डफळापूरकर ......... २३५ |
| 'कविता श्रमाची' मधील श्रमजीवी | प्रा. विठ्ठल नामदेव रोटे ............... २३८ |
| बेडा कुंभार आणि बलुतेदारांची श्रमसंस्कृती | डॉ. सुभाष गणपती जाधव ............ २४१ |
| आदिवासी साहित्यातील श्रमचित्रण | प्रा. सुलोचना रमेश दंतराव ........... २४४ |
| १९८० नंतरच्या कादंबरीतील श्रमिकांचे चित्रण | डॉ. माधव मारुती भोसले............. २४७ |
| आदिवासींच्या कादंबरीतील श्रमिक | प्रा. भीमराव खंडू वानोळे ............. २५० |
| 'पाचवेळ' व 'अघोरी' कादंबरीतील श्रमसंस्कृती | प्रा. डॉ. आर. डी. कांबळे ........... २५३ |




ISSN No. 2319-6025


| | |
|---|---|
| आत्मकथनातून आलेले श्रमिकांचे चित्रण | प्रा. डॉ. चंदना अनिल लोखंडे........ २५६ |
| महानगरीय कादंबरीतील श्रमिक | प्रा. सुकुमार दादू आवळे ............. २५९ |
| नारायण सुर्वे यांच्या कवितेतील 'श्रमिक स्त्री' | प्रा. सौ. विजया प्रशांत पवार ......... २६३ |
| चंदगडी बोली आणि श्रमसंस्कृती | प्रा. गुंडूराव कांबळे .................... २६६ |
| कविता श्रमाची : श्रमसंस्कृतीची गाथा | डॉ. रचना सचिन माने ................ २६९ |
| आदिवासी जमातियों की श्रमसंस्कृति | गणेश ढुंढा गभाले ..................... २७३ |
| हिंदी साहित्य में श्रमजीवी नारी का आर्थिक शोषण | प्रा.माधुरी पाटील, प्रा. शिवाजी पाटील २७७ |
| हिंदी कविता में चित्रित आम आदमी की स्थिति | लेफ्टनंट डॉ. रविंद्र पाटील ............ २८० |
| नेन्द्र कोहली के पौराणिक उपन्यासों में चित्रित ग्रामीण संस्कृति | प्रा. माणिक मोरे, डॉ. कृष्णात पाटील २८३ |
| The portrayal of working class in the plays of Shakespeare | Mr. Dinkar Nangare ............ 285 |
| महात्मा फुले आणि श्रमिक शेतकरी | प्रा. निलेश घोलप, डॉ.जी.एच.आळतेकर. २८८ |
| अण्णा भाऊ साठे यांची कादंबरी आणि श्रमसंस्कृती | डॉ.बी.आर.गाडवे, प्रा. प्रकाश नाईक २९१ |
| संतमेळा आणि श्रमंस्कृती | प्रा. रघुनाथ आण्णा मुडळे ............ २९४ |
| छ. शाहू महाराज आणि श्रमिक शेतकरी | प्रा. ज्योती बाजीराव थोरात .......... २९७ |
| धग, पाचोळा, गोतावळा मधील श्रमसंस्कृती | संगीता साईप्रकाश आरळी ............ ३०० |
| लोकगीतातील श्रमिक स्त्री | कु. रोहिणी गजानन रेळेकर ........... ३०३ |
| श्रमसंस्कृती आणि मराठी कवितेतील कष्टकरी स्त्री चित्रण | प्रा.कु.लक्ष्मी पवार .................... ३०७ |
| ऊसतोड कामगारांचे चित्रण करणारी मराठवाडी कविता | सौ. विजयालक्ष्मी विजय देवगोजी .... ३१० |
| श्रमसंस्कृती आणि मराठी साहित्य | श्री. दत्तात्रय शामराव मिठारी ......... ३१३ |
| प्रवासवर्णनातील श्रमसंस्कृती | प्रा. वैशाली श्रीकांत गुंजेकर .......... ३१६ |
| धनगरांची श्रमसंस्कृती आणि साहित्य | अभिषेक दादासाहेब श्रीराम ........... ३१९ |
| श्रमप्रतिष्ठेला पुजणारी आदिवासी कविता –'आदोर' | श्री. रघुनाथ चंद्र गवळी ............. ३२२ |
| स्त्रीगीतांमधील श्रमजीवनाचे चित्रण | लता ऐवळे, नाईकबा गिड्डे............ ३२५ |
| श्रम, श्रमिक आणि लेखकांचे आकलन | प्रा. नीता निवास कदम ............... ३२८ |
| ग्रामीण कादंबऱ्यातील कष्टकरी स्त्रीचे चित्रण | शीतल शिवाजीराव धुमाळ............ ३३१ |
| 'भंगार' : भटक्या गोसावी समाजाची श्रमसंस्कृती | प्रा. प्रदीप गोविंदराव राठोड........... ३३४ |
| नमाजोरी आणि श्रमिकांचे शोषण | कु. साजिदा सरदार आरवाडे.......... ३३७ |
| श्रमसंस्कृती : परंपरा आणि स्वरूप | प्रा. पुरुषोत्तम गुणवंतराव पखाले ...... ३४० |
| व्यंकटेश माडगूळकरांच्या कथेतील दलित श्रमिक | प्रा. सुनिता जाधव, कु. सुचिता कांबळे ३४३ |


ISSN No. 2319-6025



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

# 'भंगार' : भटक्या गोसावी समाजाची श्रमसंस्कृती

प्रा. प्रदीप गोविंदराव राठोड
दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज महाविद्यालय, इचलकरंजी

**प्रास्ताविक**

श्रमाशिवाय माणूस आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही. श्रम हे प्रत्येकासाठी अनिवार्य आहे. ज्यांना गावात स्थान आहे, शेती आहे, नोकरी आहे, उद्योगधंदा आहे त्यांनाही श्रम करावे लागतात आणि ज्यांना गावात स्थान नाही, घर नाही, नोकरी नाही, उद्योगधंदा नाही अशा भटक्या जमातीतील लोकांनाही श्रम करावेच लागतात. ज्यांना समाजव्यवस्थेने नाकारले आणि गुन्हेगार ठरविले त्यांच्या वाट्याला भटकेपण आले. अशाच भटकेपण वाट्याला आलेल्या गोसावी जमातीतील अशोक जाधव यांनी 'भंगार' या आत्मचरित्रातून भटक्या गोसावी समाजाचं जगणे प्रत्ययकारीपणे मांडले आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अनुषंगाने भंगार गोळा करून उदरनिर्वाह करणाऱ्या अशोक जाधवांची पर्यायाने भटक्या समाजाची वेगळी श्रमसंस्कृती आणि वेदना याविषयी विवेचन करणार आहोत.

**स्त्री–जीवनाच्या वेदनेचे चित्रण**

भटक्या गोसावी समाजातील स्त्रिया आपल्या मुलांना सोबत घेऊन पहाटेपासून भंगार वेचायला बाहेर पडत असत. लहान बाळाला कोंडाळ्याच्या बाजूला सावलीत निजवून भंगार जमा करत असत. भूक लागली असता कचऱ्यात सापडलेले अन्न आपल्या पदराने पुसून मुलांना खायला देत. भंगार विकून मिळालेल्या पैशातून गिरणीखालचं पीठ, चिकन सेंटरवरील फेकून देण्याजोगा मटणाचा भाग त्याला 'छाटण' म्हणत. ते विकत घ्यायचे आणि संध्याकाळी चूल पेटवायची, नवऱ्याचा दारू पाण्याचा खर्च भागवयाची. लेखक म्हणतो,''जमातीतील पुरुष मुलाच्या नि बायकांच्या मिळकतीवर आयतं बसून खायचे.'' (पृ.१३) पुरुष मंडळी स्त्रियांवर व मुलांवर अन्याय करायचे. त्यांनी कमवून आणले नाही तर प्रसंगी मारझोड करायचे.

भटक्या गोसावी समाजातील स्त्रियांना मूकपणे अन्याय–अत्याचार सहन करावा लागत असे. भंगार गोळा करणारी स्त्री सुरक्षितपणे घरी येईल याची खात्री नसे. बारा– तेरा वर्षांची होबडी ही दिसायला सुंदर होती. इचलकरंजीच्या आसरा नगरातल्या मैलखड्ड्यातून भंगार वेचून आंब्याच्या झाडाखाली भंगार वेगळे करीत असताना बाटल्या देण्याच्या बहाण्याने एक नराधम तिच्यावर बलात्कार करतो. वैरण चोरी करताना हौसाईला डोक्यात मार बसून पोटच्या गोळ्याला वाचविण्यासाठी चोरी करताना रमाचा मृत्यू होतो. होबडीप्रमाणेच इंदिराचा देखील लैंगिक छळ होतो. जयाचा क्रूरपणे खून केला जातो. भंगार वेचण्यासोबत या स्त्रिया मिळेल ते काम करायच्या. लग्नाच्या वरातीत दोन रुपये मजुरीवर रात्रभर बत्ती धरायच्या. घाणीत गटारीत भंगार गोळा केल्यामुळे अनेक स्त्रिया असाध्य रोगांनी ग्रस्त झाल्या. बानुचा विजेच्या तारेने धक्का लागून मृत्यू होतो. या स्त्रियांना भाकरीचा प्रश्न सोडविताना मरण यातना भोगाव्या लागल्या. उदरनिर्वाहाची साधने नसल्यामुळे या स्त्रियांना हा भोग भोगावा लागला.


ISSN No. 2319-6025

समाजातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी लेखक प्रयत्न करतात. जातपंचायतीला न जुमानता आनंदीला डॉक्टर व सुधाला शिक्षिका बनवितात. परंतु सुधाच्या घरच्याने तिला जबरदस्तीने राजीनामा द्यायला भाग पाडतात. मारहाण करतात. स्त्रीला भोगवस्तू म्हणून वापरून कचऱ्यासारखं फेकून देतात. त्यामुळे लेखक अस्वस्थ होतो आणि समाजव्यवस्थेलाच थेट प्रश्न विचारतो, ''हे कधी संपणार? गोसावी समाजाच्या स्त्रियांच्या वाट्याला मानाचं जगणं कधी मिळणार?'' (पृ.१६९)

**भुकेचे विदारक चित्रण**

मराठी साहित्यातून यापूर्वी दलित आणि भटक्या जमातीतील 'आठवणींचे पक्षी', 'तराळ–अंतराळ', 'कोल्हाट्याचं पोर', 'बलुतं', 'उपरा', 'उचल्या' अशी अनेक आत्मचरित्र आली. त्यातून त्यांनी आपापल्या व्यथा, वेदना प्रकट केल्या. भंगार या आत्मचरित्रातील गोसावी समाजाचे भटके जीवन, भुकेचे चित्रण अंतःकरण पिळवटून टाकणारे आहे. काखेत झोळी अडकावयाची आणि भिक्षा मागून, भंगार वेचून पोटासाठी चाललेली त्यांची धडपड पशुनांही लाजविणारी वाटते.

उकिरड्याच्या बाजूला झोपलेली मुलगी भुकेमुळे औषधाची बाटली तोंडात घालते, त्यातच तिचा मृत्यू होतो. चपातीच्या आशेने अशोक, गज्या बिगारी काम करतात. उन्हाळ्यात भिकेचे तुकडे मिळवून वाळवायचे, पोत्यात भरून ठेवायचे. भाकरीमुळे जमातीत कधी–कधी भांडणेही होत. लग्न, तेरवी अशावेळी या जमातीतील मुले, ''ये मामा लाडू दे की, भात दे की'' (पृ. ३८) असे लाचार होऊन भीक मागताना दिसतात. तिथूनही त्यांना ही व्यवस्था हाकलून लावते. उरलेले अन्न जेव्हा उकिरड्यावर टाकले जाते तेव्हाचा प्रसंग हृदय पिळवटून टाकणारा आहे. लेखक म्हणतो, ''उकिरड्यावरच्या अन्नात तीनं वाटण्या पडल्या होत्या. एक आमची, दुसरी कुत्र्याची नि तिसरी डुकरांची.'' जे अन्न कुत्र्यांना, डुकरांना टाकले जाते ते अन्न या मुलांना खावे लागते. म्हसोबाच्या जत्रेत लोक कोंबडा बळी देत. कोंबड्याची मुंडकी मिळविण्यासाठी आंद्या, सजन्या, सुन्या, अशोक पोती घेऊन जायचे सोबतीला गावातील कुत्रेही असायचे. त्यावेळी अशोकच्या हाताला कुत्रा चावा घेतो. भुकेची ही विदारकता आपल्याला अंतर्मुख व्हायला भाग पाडते.

**शिक्षणासाठी कष्ट**

लेखकाला शिक्षणासाठी खूप कष्ट करावे लागले. तो जेव्हा, ''मे साळा सिकवारो.'' ( मी शाळा शिकणार. ) (पृष्ठ क्र. १७) असे म्हणतो. तेव्हा त्याला त्याचे वडील भीक मागायच्या आणि भंगार गोळा करायच्या अटीवर परवानगी देतात. शिकण्याची त्याची जिद्द त्याला पुढे जगण्याचं बळ देत राहते. लेखक भंगार जमा करूनच शिक्षणासाठीचा खर्च भागवतो. उकिरड्यावर कोरे कागद सापडत तेच सुई–दोऱ्याने शिवून त्याची वही तयार करायचा. बिगारी काम करून, कंपनीत काम करून शिक्षणासाठी पैसा जमा करतो. सजन्या हा लेखकाचा जिगरी मित्र. त्याच्या सोबत लेखक ढकलगाड्यावर भंगार जमा करत असत. इचलकरंजीला नगरपालिकेच्या जागेत जेव्हा ते स्थायिक होतात. पाल मांडतात. परंतु तेव्हा वीज नसल्यामुळे लेखक रस्त्यावरच्या दिव्याखाली अभ्यास करतात. टायफाईड असताना दहावीचा पेपर देतात. यंत्रमागाचा आवाज, जमातीतील भांडणे यांच्या कल्लोळातही लेखक

ISSN No. 2319-6025


Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

एकाग्रतेने अभ्यास करतो. परीक्षा फॉर्म भरण्यासाठी भंगा[illegible]याकडून भंगार जमा करायच्या अटीवर पैसे घ्यायचा. अशा प्रतिकूल परिस्थितीतही लेखक बी.एड्. पर्यंतचे शिक्षण घेतो. लेखक म्हणतो, "शिक्षक म्हणून नोकरीस लागणारा जिल्ह्यातला गोसावी जमातीचा मी पहिलाच होतो."(पृ.१४२) या समाजाच्या दृष्टीने ही अभिमानाची गोष्ट आहे हे पाहायला मिळते.

लेखक शिक्षक म्हणून रुजू होतात. परंतु ११ महिन्यापर्यंत हातात पगार पडत नाही. तेव्हाही लेखकाला भंगार गोळा करूनच उदरनिर्वाह चालवावा लागतो. स्वातंत्र्यानंतरच्या पन्नासाव्या वर्षीही शिक्षक झालेल्या गोसावी जमातीतल्या एका शिक्षकाला भंगार गोळा करून, भीक मागून विद्यादानाचे कार्य करावे लागते ही राष्ट्राची प्रगती म्हणायची की अधोगती हा प्रश्न आपल्याला पडतो. आजही असे बरेच शिक्षक असे आहेत, की त्यांना उदरनिर्वाहासाठी अप्रतिष्ठेची कामे करत जगावे लागते. राष्ट्राचा शाश्वत विकास व्हावयाचा असेल तर इथल्या प्रत्येकाच्या हाताला योग्य ते काम आणि योग्य तो मोबदला मिळणे गरजेचे आहे.

**जमातीची जातपंचायत आणि प्रथा–परंपरा**

भटक्या गोसावी जमातीची जातपंचायत म्हणजे सर्वोच्च न्यायालय. जातपंचायतीच्या निर्णयामुळे अनेकांची आयुष्ये बरबाद झालेली दिसतात. होबडी या मुलीवर बलात्कार होतो तरी जातपंचायत तिलाच दोषी ठरविते. मुलामुलींना शाळेत शिकू न देणे, दवाखान्यात जाऊ न देणे, देवाचा कोप होतो या कुप्रथेमुळे या समाजाची प्रगती थांबते. दारिद्र्याचे ओझे घेऊन भटकणारी ही जमात दसरा व शिमग्यालाच एकत्र येत असत. या जमातीतील 'धारुच्यो' आणि 'उभायत' या प्रथेमुळे अनेकांची आयुष्ये धुळीस मिळाली. धारुच्यो म्हणजे स्त्रीला सोडचिठ्ठी देऊन तिचे दुसरे लग्न लावून देणे. जातपंचायतीने एखाद्या स्त्रीला 'उभायत' ठरविले, की तिला आयुष्यभर कोणीही नांदवून घेत नाही. अशी ही जातपंचायत कुणाच्याही लग्नाची सुपारी कधीही फोडू शकते, स्त्रीवर संशय घेऊ शकते. हौसाई, होबडी, मोरनी, तुळसा अशा अनेक स्त्रिया जातपंचायतीच्या निर्णयामुळे, प्रथा परंपरेमुळे भरडल्या गेल्या. प्रथा–परंपरेचा पगडा इतका होता, की लेखकाला जेव्हा वाऱ्याफोड्या उठतात तेव्हा त्याचे वडील, "जगलं तर आमचं, नाय जगलं तर देवाचं." (पृ. ६३ ) असे म्हणतात.

**समारोप**

गोसावी समाजात जन्माला आलेल्या अशोक जाधव यांच्या आयुष्यात आलेले अनेक चढ-उतार, त्यांनी झेललेले आघात, याविषयीचे अस्सल अनुभव यामुळेच 'भंगार' हे आत्मचरित्र अधिक समर्थपणे अवतरले आहे. दिशाहीन झालेल्यांना दिशा दाखविण्याचे बळ निश्चितच यातून मिळते. मूळ अनुभवाची दाहकताच इतकी आहे की लेखनात अनावश्यकता, अवास्तवता कुठेच दिसत नाही. त्यांच्या निवेदनात पाल्हाळीकपणा नसून भाषाशैलीही अनुभवाला आकार देणारी आहे. एक कसदार आत्मचरित्र कसे असावे याचा उत्कृष्ट नमुना म्हणून 'भंगार' या आत्मचरित्राकडे पाहता येईल.


**संदर्भ**

१. जाधव अशोक, 'भंगार' मनोविकास प्रकाशन, पुणे – २०१७




ISSN No. 2319-6025


# तनमाजोरी आणि श्रमिकांचे शोषण


कु. साजिदा सरदार आरवाडे

मु. पो. निमशिरगांव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर


श्रमिक हा शब्द आज व्यापक अर्थाने वापरला जातो. पण मराठी विश्वकोशात कामगार किंवा श्रमिकांची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले आहे की, द्रवरूपाने वा वस्तुरूपाने मिळणाऱ्या मोबदल्यात शारीरिक वा मानसिक श्रम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस कामगार किंवा श्रमिक असे म्हणतात. आपल्या गरजा भागविण्यासाठी जो कष्ट करतो तोच खरा श्रमिक होय. श्रमिक वर्गात कारखान्यात काम करणारे नोकर, शेतात काम करणारे शेतमजूर, कंत्राटी कामगार, घरात काम करणारे नोकर इत्यादींचा समावेश होतो.

श्रमिक संस्कृती ही फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. कारण सुरुवातीला शिकार, कंदमुळे, फळे यावर उपजीविका करणारा समूह नंतर प्राथमिक शेती अवस्थेवर उपजीविका करू लागला. पण शेती उत्पादनाची साधने विकसित नसल्याने केवळ मानवी श्रमावर शेती करत होता. निश्चित संपत्ती, उत्पादन साधने नसल्याने तो प्राथमिक अवस्थेतच जगत होता. अश्मयुगात नंतर धातुचा शोध लागला आणि खऱ्या अर्थाने परिवर्तनाला सुरुवात झाली. लोखंडाचा उपयोग शेती नांगरण्यासाठी नांगराला फाळ बसविण्यासाठी, कुऱ्हाड तयार करण्यासाठी झाला. एकूणच या उत्पादन साधनाच्या परिवर्तनाने मानवी श्रमातून केले गेलेले उत्पादन त्याच्या गरजेपेक्षा जास्त होऊ लागले आणि त्यामुळेच श्रमचोरीला प्रारंभ झाला. आपल्या शेतीचे उत्पादन वाढावे म्हणून दुसऱ्याला जास्त नफ्याची आशा दाखवून आपल्या शेतात श्रमिक म्हणून मजूर ठेवण्याची प्रथा पडली. आपल्या समूहाव्यतिरिक्त इतर व्यक्तींना पकडून गुलाम करून माणसे जगू लागली. म्हणजेच एका माणसाच्या श्रमावर त्याच्या श्रमाची चोरी करून माणूस जगू लागला आणि येथूनच खऱ्या अर्थाने श्रमिकांच्या शोषणाला, गुलामीला सुरुवात झाली. पुढे शेती व्यतिरिक्त कारागीर, उत्पादक प्रक्रिया, उद्योगधंदे इत्यादीमध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात श्रमिकांना गुलाम करून त्यांच्यावर शोषण केले जाऊ लागले. पण नंतर श्रमिकांना आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराची जाणीव होऊ लागली आणि ते मालकांविरोधात बंड करू लागले.

दलित श्रमिक संस्कृतीत शोषणाचे प्रमाण जास्त आहे. हे आपण दलित साहित्य वाचल्यानंतर लक्षात येते. वर्षानुवर्षे दलित, पीडित श्रमिक कामगार, नोकर, गुलामी करणारा हा वर्ग श्रम करण्याच्या नावाखाली सतत शोषित अवस्थेत जगत असतो. पण अन्याय, अत्याचार सहन करणाऱ्या या श्रमिकांना जेव्हा आपल्यावर होणाऱ्या शोषणाची जाणीव होते तेव्हा तो बंड करून उठतो आणि अशाच एका दलित आदिवासी श्रमिकांचा वेठबिगारीविरुद्ध, गुलामगिरी विरुद्धचा संघर्ष 'तनमाजोरी' या नाटकात प्रेमानंद गज्वी यांनी मांडला आहे.

**'तनमाजोरी' नाटकातील श्रमिकांचे शोषण आणि संघर्ष**

'तनमाजोरी' हे प्रेमानंद गज्वी यांचे प्रसिद्ध नाटक आहे. या नाटकात शोषण आणि वेठबिगारी विरुद्ध दलित आदिवासींचा संघर्ष आलेला आहे. माणसाला त्याच्या


ISSN No. 2319-6025




Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

ISSN 2230-7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

## मराठी समाजशास्त्र परिषद

वर्ष ३७ वे, अंक २४ वा, डिसेंबर, २०१९.

भारतातील समाजशास्त्राची शतकपूर्ती विशेषांक

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शिर्षक | लेखक | पृ. क्र. |
|---|---|---|---|
| १. | भारतातील समाजशास्त्र अध्ययन शतकपूर्ती | डॉ. उत्तम भोईटे | ...१ |
| २. | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. पी. जी. जोगदंड | ... ४ |
| ३. | महाराष्ट्रातील सामाजिक चिंतन | डॉ. जगन कराडे | ... ६ |
| ४. | भारतातील सामाजिक चळवळीबाबत समाजशास्त्रीय संशोधकांची उदासीनता | डॉ. प्रदीप आगलावे | ...१२ |
| ५. | मानवशास्त्राची वाटचाल : महाराष्ट्रातील साहित्य आणि संशोधन परंपरा | डॉ. शौनक कुलकर्णी | ...१४ |
| ६. | कमला भसीन : एक दुर्लक्षित समाजशास्त्रज्ञ | प्रा. संदीप चौधरी | ... १८ |
| ७. | शासतंत्रीय मनोवृत्ती व अवकाशाचे राजकारण.... | डॉ. धनराज पाटील | ...२० |
| ८. | दलित अभिजनासंबंधीचा अभ्यास..... | प्रा. प्रियदर्शन भवरे | ...२५ |
| ९. | स्वात्यंत्रोत्तर भारतातील निवडक समाजशास्त्रीय संशोधने | डॉ. एन. टी. कांबळे | ...३४ |
| १०. | प्रा. शर्मिला रेगे यांचे समाजशास्त्रातील योगदान | प्रा. संजय कांबळे | ...४० |
| ११. | डॉ. सुधाताई काळदाते : चतुरस्त्र समाजशास्त्रज्ञ | डॉ. स्मिता अवचार | ...४९ |
| १२. | पीएच. डी. संशोधन पर्व : निकड बदलाची | डॉ. नारायण चौधरी | ...५१ |
| १३. | भारतीय समाजशास्त्राची शतकपूर्ती : स्थिती आणि स्थित्यंतरे | डॉ. श्रीकांत गायकवाड | ...५३ |
| १४. | भारतातील समाजशास्त्र विषयाची शताब्दी अवलोकन आणि वाटचाल | डॉ. बालाजी केंद्रे | ...५८ |
| १५. | मराठवाडा विद्यापीठांतर्गत समाजशास्त्र विषयाची वाटचाल | डॉ. सोंडगे, डॉ. मोटे | ...६० |
| १६. | समाजशास्त्राच्या विकासात रा. तु. म. नागपूर विद्यापीठाचे योगदान | डॉ. वी. के. स्वांई | ...६२ |
| १७. | भारतीय समाजशास्त्राचा विकास : आव्हाने आणि भवितव्य | डॉ. भगवान मनाळ | ...६४ |
| १८. | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम | डॉ. कालीदास भांगे | ...६७ |
| १९. | प्रसार माध्यमे, सामाजिक परिवर्तन आणि लिंगभावाचे वास्तव... | डॉ. मोहन नगराळे | ...७१ |
| २०. | वर्तमानकाळात विवाहसंस्थे समोरील आव्हाने... | डॉ. दिपक पवार | ...७३ |
| २१. | भारतीय समाजशास्त्राच्या विकासात मुंबई विद्यापीठाचे योगदान | डॉ. धारबा गणवीर | ...७५ |
| २२. | वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या: एक नवे आव्हान | डॉ. राजेंद्र बगाटे | ...७७ |
| २३. | भारतात समाजशास्त्राचा विकास | डॉ. रामेश्वर मोरे | ...८० |
| २४. | ई–सिगारेट: सामाजिक समस्या | डॉ. रविंद्र विखार | ...८३ |
| २५. | भारतामधील समाजशास्त्राच्या विकासात समाजशास्त्रज्ञांचे योगदान | डॉ. प्रतिभा बिरादर | ...८५ |
| २६. | भटक्या–विमुक्त जमातींच्या चळवळींची विचारसरणी | डॉ. अर्जुन जाधव | ...८७ |
| २७. | ग्रामविकास कार्यक्रमविषयक स्थानिक प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टिकोण | डॉ. साहेबराव हिवाळे | ...९३ |
| २८. | महाविद्यालयीन स्तरावरील समाजशास्त्र अभ्यासक्रमाविषयी शिक्षकांची ..... | डॉ. मंजुषा नळगीरकर | ..९७ |
| २९. | भारतीय प्रसारमाध्यमातील जातीवाद | डॉ. प्रदीप गजभिये | ..१०० |
| ३०. | आधुनिक भारतातील स्त्रीभ्रूण हत्या | डॉ. हेमंत सोनकांबळे | ..१०२ |
| ३१. | आदिवासी जमातींचे बदलते स्वरूप | प्रा. मनोहर येरकलवार | ..१०५ |
| ३२. | सायबर गुन्हा आणि सायबर सुरक्षितता: उक अध्ययन | डॉ. ज्योती पोटे | ..१०८ |
| ३३. | भारतातील ग्रामीण विकास | डॉ. श्रीराम खाडे | ...१११ |
| ३४. | ई–साक्षरता : शिक्षण क्षेत्रातील नवप्रवाह | डॉ. नलिनी बोरकर | ..११३ |
| ३५. | समाजशास्त्रीय संशोधनाची प्रासंगिकता | डॉ. सरोज आगलावे | ..११६ |
| ३६. | २९ व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा अहवाल | डॉ. दिपक पवार | ..११९ |




Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document certified

समाजशास्त्र संशोधन पत्रिका, वर्ष ३७ वे, अंक २४ वा, डिसेंबर, २०१९. ISSN 2230-7745

# भटक्या–विमुक्त जमातींच्या चळवळींची विचारसरणी

डॉ. अर्जुन पांडूरंग जाधव, दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, जि.कोल्हापूर.

डार्विनच्या मतानुसार ''तोच 'जीव' सृष्टी जिवंत राहू शकतो, जो 'अस्तित्वासाठी' संघर्ष करतो.'' डार्विनचा हा नियम मानवी समाजालाही तंतोतंत लागू पडतो. कारण मानवी समाजामध्ये अनेक श्रेष्ठ–कनिष्ठ, उच्च–निच्च अशा वेगवेगळ्या आधाराचे मानवी समुदाय आहेत. अर्थातच, जो समुदाय बलवान असतो, तो समुदाय कमकुवत किंवा कनिष्ठ समुदायावर आपले वर्चस्व निर्माण करतो. अशा परिस्थितीत कमकुवत किंवा कनिष्ठ समुदायाला स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागतो. परिणामी जो संघर्ष करतो तोच टिकतो हा मानवी समाजाचाही इतिहास आहे.

ज्या समुदायाला आपल्यावर अन्याय होत आहे याची जाणीव होते. याच जाणिवेतून समाज संघटित होतो व आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करण्यासाठी प्रवृत्त होतो. शासन किंवा प्रशासनही संघर्ष करणाऱ्या समाजाची दखल घेत असते. उदाहरणार्थ ब्रिटिशांना भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या चळवळीची दखल घ्यावी लागली. त्याचबरोबर आदिवासी चळवळ, शेतकरी चळवळ, कामगार चळवळ, दलित चळवळ, महिला चळवळ यासारख्या अस्तित्वासाठी उभ्या राहिलेल्या चळवळींची दखल शासनकर्त्यांना घ्यावी लागली आहे, हा इतिहास आहे. या चळवळी साहित्यातूनही आपला विद्रोह मांडत आल्या आहेत. त्यामुळे अस्तित्वासाठीच्या चळवळीमधून अनुयायांपुढे एक दिशा ठेवली जाते. या चळवळीमुळेच आदिवासी, कामगार, दलित, शेतकरी, महिला यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले, त्यांच्या प्रागतिक विचारांची सुरुवात झाली.

भटक्या–विमुक्तांची चळवळ ही गेली ४ ते ५ दशके स्वत:चे अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघर्ष करीत आहे. मात्र या चळवळीची दखल शासनाकडून घेतलेली दिसून येत नाही. अगदी इतिहासकार, साहित्यिक, सामाजिक चळवळीचे अभ्यासक तसेच परिवर्तनवादी सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडूनही 'भटक्या–विमुक्तांची' चळवळ दुर्लक्षित राहिली आहे. भटक्या–विमुक्तांची ही चळवळ देशभर सुरू आहे. तिचा प्रभाव कमी–अधिक असला तरी चळवळ सुरू आहे.

'भटक्या–विमुक्त' चळवळीच्या उदयाकरिता वेगवेगळ्या विचारसरणी कारणीभूत ठरल्या. त्या विचारसरणीचा आढावा या शोधनिबंधात घेण्यात आलेला आहे.

१. साम्यवादी विचारसरणीतून निर्माण झालेल्या चळवळी :– १९५२ नंतर भटक्या–विमुक्तांची शिक्षण घेतलेली पहिली पिढी, या पिढीला आपल्या समाजावरील व आपल्यासारख्याच इतर जमातींवर अन्याय–अत्याचाराची जाणीव होऊ लागली. हा अन्याय–अत्याचार दूर झाला पाहिजे ही भावना तीव्र झाली. यामागील प्रेरणा त्यांना त्यांच्या शिक्षणातून व कामगार संघटनांच्या चळवळीतून मिळाल्याचे आढळून येते. लक्ष्मण गायकवाड हे एका सुतगिरणीमध्ये कामगार म्हणून काम करीत होते. सुतगिरणीमध्ये काम करित असताना त्याठिकाणी असणारी कामगाराची संघटना, त्या संघटनेवरील मार्क्सवादी विचारांचा प्रभाव, त्या संघटनेच्या कार्यपद्धतीचा व मार्क्सच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला आणि या प्रभावातून त्यांनी आपल्याही समाजावरील अन्याय दूर करण्यासाठी एखादी संघटना असावी. म्हणून 'वडार पाथरवट समाज संघटना' स्थापन केली. नंतर इतर जमातींचे लोक उदाहरणार्थ कैकाडी यांना एकत्रित करून त्यांनी भटक्या–विमुक्तांची संघटना स्थापन केली व १९७६ ला पहिला मोर्चा काढला. थोडक्यात जी पहिली पिढी शिकली, त्यांच्यात अन्यायाची जाणीव झाली या लोकांनी इतर कामगार संघटनाच्या चळवळीचे अवलोकन केले. याच काळामधील मार्क्सवादी विचारांनी प्रभावित कामगार संघटना अधिक प्रभावी होत्या. या प्रभावातूनही भटक्या–विमुक्तांच्या चळवळीचा उदय झाल्याचे आढळून येते.''

२. फुले व आंबेडकरी विचारातून उदयास आलेल्या चळवळी :– महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक प्रभावातून १९७२ मध्ये दलित पँथरची स्थापना झाली. ही संघटना अधिक आक्रमकपणे कार्यरत होती. या चळवळीचा प्रभाव अनेक दलितांमधील समुदायांवर पडला. तसाच तो भटक्या विमुक्त जमातीच्या समुदायावरही पडलेला दिसून येतो. ही चळवळ विशेषत: मुंबई, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणी अधिकप्रभावी होती. मुंबईमध्ये ग्रामीण भागातून आलेल्या तरुणांवर या संघटनेचा विशेष प्रभाव होता. मुंबईमध्ये या चळवळीच्या प्रेरणेतून भटक्या–विमुक्तांच्या चळवळीची सुरुवात झाली. बाळकृष्ण रेणके यांच्यासारखे तरुण मुंबईमध्ये आपल्या समाजबांधवांना संघटित करण्यासाठी ज्या दिवशी काम बंद आहे, त्यादिवशी झोपडपट्ट्यातून फिरायचे. कमवा आणि शिका या योजनेमधून १९६२ ला पदवीधर असलेले रेणके दादर रेल्वे स्टेशनवर रहायचे, त्यामुळे त्यांची रेल्वेच्या लोकांची ओळख झाली. पदवीधर असल्याने लोकांची सहानुभूती मिळाली. झोपडपट्ट्यांमधून फिरताना त्यांना काही शिक्षित लोक मिळाले, काही नोकरी करणारे भटक्यांचे लोक मिळाले. दलितांवरील अन्यायाविरुद्ध 'दलित पँथर' संघर्ष करीत आहे हे बघून भटक्यांसाठी काही करावे असे वाटू लागले आणि रेणकेंनी भटक्या विमुक्तांच्या चळवळीस सुरुवात केली. पुढारी, स. का. पाटलांसह लोक चाळीचाळीत हात जोडून लोकांना विनंती करत होते की मतदानाला चला. लोक गेले नाहीत. दलित पँथरने आवाहन केले म्हणून नायगाव भागात जवळजवळ ५० टक्के दलित्तोतर समाज आहे पण सर्वच समाजावर दलित पँथरच्या आवाहनाचा परिणाम झाला. रोजा देशपांडे या डांगेच्या कन्या निवडून आल्या. या घटनेने रेणकेंना आत्मचिंतन करायला भाग पाडले. एकेका जमातीचे संघटन करून काही उपयोग होणार नाही. त्यावेळेस बंजाराची संघटना, वडारांची संघटना, कैकाड्यांचीसुद्धा संघटना, भोईची संघटना होती. या एकेका जातीच्या संघटना, या संघटना काय परिणाम करतायत सरकारवर, सरकारच्या धोरणावर, बाबासाहेब आंबेडकरांनी जे सांगितले त्या दृष्टिकोनातून धोरण ठरवल्यावर या काय करताहेत. या स्वतंत्र संघटना त्याचा परिणाम शून्य होता. उलट या सगळ्या संघटना ब्राह्मणवादी आहेत असे रेणकेंना वाटू लागले. भटक्यांच्या वेगवेगळ्या संस्था संमेलने मेळावे घेतात. त्याचबरोबर ते सत्यनारायणाची पूजापण करतात, अंबाबाईची पूजापण करतात, गोंधळपण घालतात. जागरणपण करतात. हे सगळे करतात मात्र यांना स्वत:च्या जातीची खूप अस्मिता आहे. या देशातील दलित भटक्यांचे प्रश्न सोडवायचे तर जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असे डॉ. आंबेडकर सांगतात. अशा परिस्थितीत दलितांमध्ये महार ही जात प्रबळ आहे, जागृत आहे. दलित पँथर प्रभावी आहे परंतु, एकाच जातीचं संधान आहे.

त्यावेळेस सहा कामगारांची कमिटी होती भटक्या–विमुक्तांच्या कल्याणावर. कारण १९६० भटक्या विमुक्तांचं एक वेगळं डिपार्टमेंट ६०–६१ ला महाराष्ट्र सरकारने तयार केले कालेलकर आयोगाच्या



Signature Not Verified
SHAHAJAHAN
MEHABUB MANER
Document Certified

शिफारशीप्रमाणे. कालेलकर आयोगाचा अहवाल केंद्र सरकारने स्विकारला नाही. १९६०–६१ ला भटक्या–विमुक्तांची एक स्वतंत्र यादी महाराष्ट्र सरकारने केली 'खाडे कमिशन' नेमून आणि त्या यादीप्रमाणे आणि त्या कमिशनच्या शिफारशीप्रमाणे ४ टक्के रिझर्व्हेशन ठेवून एक वेगळी कॅटॅगरी तयार केली आणि मग ६०–६१ पासून याचे काय होतेय, सरकारनी काय ठेवलेय, काय योजना आहेत, पैसा किती ठेवलाय, लोकांपर्यंत जातो किती, लोकांचे कल्याण किती झाले. याचे परीक्षण करण्यासाठी ते एक कमिटी नेमण्याचा निर्णय होता. सहा लोकांची कमिटी. त्या कमिटीचे अहवाल म्हणजे डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखे. प्रत्यक्षात काहीच नाही नुसता देखावा आहे असा त्या कमिटीचा अहवाल होता. त्याचा आधार घेऊन, बाळकृष्ण रेणके यांनी मुंबईतल्या झोपडपट्टीची परिस्थिती बघून, भटक्या–विमुक्तांवर अन्याय अत्याचाराचे प्रकरण बघून, मग एक दीर्घ लेख लिहिला. महाराष्ट्र टाईम्समध्ये शनिवारी पूर्वार्ध आणि रविवारी उत्तरार्ध अशा दोन सदरामध्ये लेख प्रसिद्ध झाला. विशेष म्हणजे रविवारी गोविंद तळवलकरांनी त्याच्यावर अग्रलेख लिहिला की या महत्वाच्या समाज घटकाकडे शासनाचे आणि समाजाचे दुर्लक्ष झाले.

त्यानंतर बाळकृष्ण रेणके यांनी मुंबईत सकाळ, नवाकाळ, महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती या वर्तमानपत्रामध्ये भटक्या–विमुक्तांच्या प्रश्नावर लिहिणे सुरू केले.

वृत्तपत्रातील लेखामुळे भटक्या–विमुक्तांचे शिक्षीत असे एकत्र येऊ लागले. त्यातून एक हौसिंग सोसायटी स्थापन झाली. त्यावेळी मुंबईत हौसिंग सोसायटी कैकाड्यांनी केली, बंजाऱ्यांनी केली, भोईंनी केली. पण हे भिक्षेकरी आणि जे विमुक्त त्यांना वाली नाही. मात्र, बाळकृष्ण रेणके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि मुंबईच्या इतिहासातली ही पहिली स्पेशल केस आणि शेवटची स्पेशल केस केली. लो इन्कमच्या लोकांना हाय इन्कम ग्रुपची सोसायटी मिळाली. चुना भट्टीशेजारी सगळे न्यायाधीश आणि मंत्री लोक होते. म्हणजे पी. के. सावंत, नाईक न्यायाधीश, खताळ पाटील मंत्री हे भटक्यांचे शेजारी बनले. या सर्व प्रकरणानंतर रेणके यांनी संघटन करायचे ठरविले पण ते एका जातीचे संघटन करायचे नाही वेगवेगळ्या जातींचे संघटन करायचे. संपूर्ण भटक्या–विमुक्त जमातींचे. गोंधळी असो, रामोशी असो, कैकाडी असो त्या सर्वांचे प्रश्न समान आहेत. असे जे प्रश्न आहेत ते घेवून आपण या सगळ्या भटक्या–विमुक्तांची एक संघटना करावी या उद्देशाने कार्यकर्ते एकत्र केले आणि मग एक अधिवेशन घ्यायचा विचार केला. बर्वे खासदार, भूई समाजाचे, दौलतराव भोसले की जे समाजवादी पक्षाचे आहेत. समाजवादी पक्ष आणि शिवसेनेच्या युतीनून ते निवडून आलेले आहेत, मुंबई महापालिकेतून. मग यांना सगळ्यांना भेटण्याची मोहिम काढली. नायगावच्या म्युनिसिपालीटीच्या क्वॉर्टर्समध्ये नगरसेवक म्हणून राहत होते. मात्र त्यांचा जातीच्या संघटनेवर विश्वास नव्हता. त्यांचा जातीय संघटना करण्यास विरोध होता. त्यामुळे त्यांनी सहभागाबाबत नकार दिला. परंतु, मधुकर दाभोळकर यांनी विश्वासात घेऊन बाळकृष्ण रेणके व त्यांचे सहकारी त्यांना पुन्हा [illegible]ले आणि त्यांनी बर्वे यांना पटवून दिले की हे एका जातीचे संघटन नाही तर अनेक भटक्या विमुक्त जमातीचे एकत्रित संघटन आहे. त्यानंतर त्यांनी भटक्यांच्या अधिवेशनात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. अधिवेशन घ्यायचे ठरले. ते अधिवेशन घ्यायची तयार झाले आणि ९ जानेवारी १९७२ ला पहिली राज्यव्यापी ऐतिहासिक परिषद झाली. (मुलाखत – बाळकृष्ण रेणके दि. ..२०१५, मुंबई.)

अशा तऱ्हेने मुंबई शहरामध्ये भटक्या–विमुक्तांच्या चळवळीला मा. बाळकृष्ण रेणके यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात झाली.

३. साहित्य क्षेत्रातून निर्माण झालेल्या चळवळी :– भटक्या विमुक्त जमातींच्या साहित्यकृतीवर दलित साहित्यिकांचा लेखनाचा प्रभाव होता. त्यामुळे दलित साहित्य समजावून घेणे आवश्यक आहे. दलित साहित्याचा उदय हा १९६० नंतरचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गेल्यानंतर दलितांना स्वतःची अस्मिता निर्माण करण्याची नवे आव्हान त्यांच्यापुढे होते. प्रस्थापितांच्या अन्यायाविरुद्ध लढा देणे आवश्यक होते. हा लढा रक्तपाताचा होणे शक्य नव्हते. परंतु, लढा देणे आवश्यक होते. दलितांच्या जीवनावर दलितांचे होणारे शोषण याला वाचा फोडणे आवश्यक होते.

अन्यायाच्या विरुद्ध दलितांच्या मनात चिड होती. त्यासाठी त्यांना बंडाची आवश्यकता होती. ते बंड दलितांनी साहित्यांच्या माध्यमातून व्यक्त करण्यास सुरुवात झाली.

प्रस्थापित हिंदू समाज व्यवस्थेने माणसाला माणूस म्हणून स्थान न देता त्यांच्यात अमानुष अशी विषमता निर्माण करून ठेवली होती. तेंव्हा या अत्याचाराला विरोध करण्यासाठी शब्द आणि साहित्याला शस्त्र बनविले आहे. म्हणून दलित साहित्यिकांची जबाबदारी प्रकट करताना आण्णाभाऊ साठे यांनी म्हटले आहे की, 'आम्ही दलित साहित्यिकांनी दलितांना वास्तव जगण्याच्या सर्व जुलमातून मुक्त करणारे साहित्य निर्माण केले पाहिजे.'

शत्रुवर विजय मिळविण्यासाठी शस्त्रांपेक्षा विचार व्यक्त करून समाजमनावर बिंबवणारे शब्दबळ हे मोठे शस्त्र आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शब्दबळाचा वापर करून शत्रुला घायाळ करण्याचा प्रयत्न सतत केला होता. तसेच पुढे आण्णाभाऊ साठे यांनी त्याच शब्द सामर्थ्याची जाणीव ठेवून समाजप्रबोधनासाठी लेखन माध्यम उपयुक्त असल्याचे दलित साहित्यिकांना सांगितले आणि स्वतः प्रचंड लेखन केले.

पिढ्यानूपिढ्या, किंबहुना शतकानुशतके पशूंसारखे लाजिरवाणे जीवन जगावे लागल्याबद्दलच्या, साचलेल्या क्रोधाचा उद्रेक म्हणजे हे दलित साहित्य होय.

दलित साहित्यामध्ये आत्मचरित्रे हा साहित्यप्रकार अधिकप्रभावी ठरला आहे. कारण त्यातील केवळ दारिद्र्याचेच नव्हे तर अत्याचार, लैंगिक शोषण, मानहानीच्या सत्य घटना इतक्या विलक्षण होत्या की, इतर साहित्यिकांना वाटले की, असेही जीवन जगणारा माणूस भारतात आहे? आणि त्यांची त्यांना माणुसपणाची लाज वाटू लागली.

दलित आत्मचरित्रे, कविता या साहित्यकृतीतून दलितांना जाणिव करून दिली की, गुलामांपेक्षाही हीन जीवन आपण जगत आहोत. याला आपणच कसे जबाबदार आहोत हेही ते साहित्यात मांडायला विसरले नाहीत. यामुळे बाबासाहेबांचा एक हेतु पूर्णत्वास जातांना दिसत होता, तो म्हणजे बाबासाहेब म्हणत, 'गुलामाला गुलाम असण्याची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करेल' आणि सत्यात तसेच घडत आले. दलित साहित्यातून सामाजिक चळवळींना संजिवनी देण्याचे कार्य करीत आहेत. हे दलित साहित्याने केले.

दलित साहित्य चळवळीमध्ये अग्रभागी होते ते आण्णाभाऊ साठे त्यांच्या लेखनकार्याला संयुक्त महाराष्ट्राचा पहिला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला.

तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णाभाऊ साठे हे मराठी लेखक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्वद्गत सर्वसामान्य जनांपर्यंत पोहचविणारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण मातीतील बोली आणि कलांचा संस्कार घेऊन आलेला सिद्धहस्त कादंबरीकार, लोकनाट्यकार म्हणून



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

त्यांची प्रतिमा आहे. ग्रामीण ढंगातील रांगड्या तमाशाला 'लोकनाट्य' हे बिरुद शाहीर आण्णाभाऊ साठे यांनी दिले. आण्णाभाऊंनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत लोकनाट्यांद्वारे जनजागृतीसाठी प्रयत्न केले. आण्णाभाऊ साठे म्हणजे जातींच्या उतरंडीमुळे शिक्षणापासून, समग्र विकासापासून वंचित राहिलेले मातंग समाजातील एक समृद्ध व्यक्तिमत्व होते. वैयक्तिक दु:खांचा विचार न करता आपले विचार, कार्य व प्रतिमा यांच्या साहाय्याने लोककलेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे आणि वंचितांच्या व्यथा प्रभावीपणे मांडणारे लोकशाहीर होते.

आण्णाभाऊ साठे यांनी ३५ कादंबऱ्या, ८ पटकथा, ३ नाटके, एक प्रवासवर्णन, १३ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, १० प्रसिद्ध पोवाडे व १२ उपहासात्मक लेख लिहिले. या साहित्यांमुळे दलित समाजामध्ये चैतन्य निर्माण झाले होते. या साहित्यकृतीमध्ये माकडीचा माळ १९६९, चिखलातील कमळ १९६९, फकिरा, अलगुज, अहंकार, आग, आघात यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

दलित साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात आत्मकथांच्या माध्यमातून दलितांचे जीवन पुढे आले. मनुष्यप्राणी असेही जीवन जगतो आहे, याची जाणीव झाली. ही जाणीव सर्व स्तरातील वाचकांना जशी झाली तशीच ती दलितांमधील शिकलेल्या पिढ्यांनाही झाली. दलित तरुण वाचकांना त्यांच्या मरण समान जीवन जगण्याची जाणीव झाली. यामुळे दलित तरुणांमध्ये अन्यायाच्या विरोधात बंड करण्याची प्रेरणा मिळाली. या साहित्यामध्ये बलुतं – दया पवार, आठवणींचे पक्षी – प्र. ई. सोनकांबळे, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे – माधव कोंडविलकर, जिणं आमुचं – बेबी कांबळे, मला उध्वस्त व्हायचंय – मल्लिका अमरशेख, माझ्या जन्मालाची चित्तरकथा – शांताबाई कांबळे, अक्करमाशी – शरणकुमार निंबाळे, काट्यावरची पोटं – उत्तम तुपे, आमचा बाप आन आम्ही – नरेंद्र जाधव, अंत:स्फोट – कुमुद पावडे, तराळ–अंतराळ – शंकरराव खरात, ढोर – भगवान इंगळे ही आणि इतर. (विकीपिडीया – १५ फेब्रुवारी, २०१७)

दलितांच्यामध्ये नवचैतन्य निर्माण करणाऱ्या साहित्य चळवळीचा प्रभाव भटक्या विमुक्तांतील शिक्षित तरुणाच्यांवर मोठ्या प्रमाणात पडत होता. या प्रभावातून लक्ष्मण माने, भीमराव गस्ती, मोतीराज राठोड, बाळकृष्ण रेणके, लक्ष्मण गायकवाड ही साहित्यिकांची पिढी निर्माण झाली. यांच्या साहित्यातून भटक्या विमुक्त जमातींचे वास्तव जीवन जगासमोर येण्यास सुरुवात झाली. एक असा वर्ग भयाण दारिद्रयात जीवन जगत आहे. हे चित्र या साहित्यातून पुढे आले. यामुळे समाजप्रबोधन होण्यास सुरुवात झाली.

भटक्या विमुक्तांचे लेखक आणि त्यांचे साहित्य पुढीलप्रमाणे,

महाराष्ट्र राज्यातील बहुतांशी दैनिक, साप्ताहिकातून प्रा. मोतीराम राठोड यांनी भटक्या–विमुक्त जमाती, आदिवासींच्या प्रश्नावर विस्तृत लेखन केले. गुन्हेगार जमाती कायदा आणि त्यांचा इतिहास यांनी प्रथम शोधून काढला जवळपास पन्नास जाती तत्सम जमाती यांची माहितीचे लेखन केले. कित्येक कार्यकर्त्यांना आपले प्रश्न लिहिण्यास प्रोत्साहन दिले. फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर बोलणारे कार्यकर्ते तयार केले, यांच्या प्रोत्साहनामुळे लेखन, वाचनाची प्रक्रिया भटक्यामध्ये सुरू झाली. ते अनेक साहित्य संमेलनात सहभागी झाले आणि त्यातून त्यांनी अनेक व्यासपीठात भटक्या विमुक्तांबद्दलचे विचार व्यक्त केले. लोकांमध्ये जागृती घडवून आणली, नामांतर चळवळीत प्रा. राठोड यांचे घर महाराष्ट्राचे कार्यालय होते. या लढ्यात प्रा. राठोड तीन दिवस जेलवासी झाले. मंडल आयोगाची चळवळ महाराष्ट्रात सर्वप्रथम प्रा. राठोडांनी सुरू केली. प्रा. राठोडाच्या रूपाने भटक्यांना खंबीर नेतृत्व मिळाले, भटक्यांना लिहायला, बोलायला शिकवले बहुजनाची चळवळ बहुजनांना सोबत घेऊन व्यापक केली.

१९५२ नंतर भटक्या–विमुक्तांच्यामधील पिढीला दलित साहित्य जवळचे वाटू लागले. साहित्याने ते देखील प्रभावित झाले आणि त्यातून १९८० नंतर भटक्या–विमुक्तांच्या आत्मकथनांना सुरुवात झाली. २५ डिसेंबर १९८० लक्ष्मण माने यांचे उपरा प्रकाशित झाले. या आत्मकथनामुळे भटक्या–विमुक्तांच्या जीवनाचे चित्रण जगासमोर आले आणि साहित्यक्षेत्र ढवळून निघाले. १९८३ ला दादासाहेब मोरे यांचे गबाळ, १५ ऑगस्ट १९८७ ला लक्ष्मण गायकवाड यांचे 'उचल्या', २०१२ मध्ये भीमराव गस्ती यांचे 'बेरड'. या आत्मकथनांमुळे भटक्या–विमुक्तांच्यातील लेखकांना एक नवीन चेहरा प्राप्त झाला. त्यांना मोठी प्रसिद्धी मिळाली. या लेखकांनी पुढे भटक्या–विमुक्तांचे संघटन उभे केले. आणि हे संघटन गेली ३०–३५ वर्षे प्रभावीपणे काम करीत आहे. १९८० नंतर लक्ष्मण माने, लक्ष्मण गायकवाड, भीमराव गस्ती भटक्या–विमुक्तांना प्राप्त झालेले असामान्य नेतृत्व होय. यामुळे भटक्या–विमुक्तांना चेहरा प्राप्त झाला.

४. समाजवादी विचारसरणीतून निर्माण झालेल्या चळवळी:– स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९४७ ला राष्ट्रसेवादल स्वतंत्ररित्या समाजवादाचा प्रसार भारतभर करीत होती. राष्ट्रसेवा दलाचा समाजवादी विचार कोल्हापूरमध्ये अधिक होता. माधवराव बागल, रविंद्र सबनिस, बापूसाहेब पाटील यांच्यावर राष्ट्रसेवा दलाचा प्रभाव होता. यांच्या सोबतीने व समाजवादी विचाराचा अंगीकार करून मा. लक्ष्मण माने, मा. व्यंकाप्पा भोसले हे सेवादलांमधील सक्रीय कार्यकर्ते बनले. पुढे त्यांनी भटक्या–विमुक्तांची चळवळ उभी केली. या नेतृत्वाने १९८० नंतर विविध आंदोलने, चळवळी, निषेध मोर्चे या माध्यमातून भटक्या–विमुक्तांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम व भटक्या विमुक्तांना चेहरा देण्याचे कार्य केले. या नेतृत्वाने भटक्या–विमुक्तांच्या चळवळीचा लढा एवढा तीव्र केला की, शासनाने भटक्या–विमुक्तांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सुधारणा करण्यासाठी काही प्रमाणात प्रयत्न करण्यास सुरुवात झाली.

''बापूसाहेब पाटील, सुरेश शिपुरकर यांच्याशी बोलणं झालं आणि साधनेला पाठींबा देण्यासाठी मोठा मोर्चा काढावा असं ठरलं. बाबुराव परिनेकर प्रा. माणगावकर, डॉ. सुदाम चौगुले शिपुरकर सारी मंडळी कामाला लागली. कोल्हापूर म्हणजे वसतिगृहांची नगरी. प्रत्येक जातीसाठी वसतिगृह, प्रत्येक कॉलेज आणि हायस्कूलसाठी वसतिगृह वसतिगृहात सध्यातरी बी. सी. मुलं जाऊन आणि [illegible] बैठका घेत फिरू लागलो. दलितांची कैफियत मांडू लागलो. रोज [illegible] दाले आणि 'साधने' साठी दोन–दोन वाजेपर्यंत माणगांवकर आणि मी फिरू लागलो'' (लक्ष्मण माने, १९८०, पृ.क्र. १०३).

५. मूलतत्ववादी विचारसरणीतून निर्माण झालेल्या चळवळी :–

बेळगाव व कोल्हापूर जिल्ह्यातील बेरड समाजाच्या समस्यांसाठी निकराचा लढा देणारे, भीमराव गस्ती हे हैद्राबादमध्ये असताना त्यांचा संघाशी संबंध आला. एम. टेक., पीएच.डी. अशा उच्च पदव्या प्राप्त केलेले गस्ती नोकरी सोडून पूर्णवेळ आर. एस. एस. चे स्वयंसेवक बनले.

बेळगाव जिल्ह्यातील यमनापूर या गावी बेरड रामोशी समाजात गस्तींचा जन्म झाला. बहुतांश निरक्षर आणि अडाणी असलेल्या समाजाच्या कपाळावर गुन्हेगारी जमातीचा शिक्काही मारला गेला होता. त्यामुळे दिवसातून तीनवेळा पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याचे बंधन, तरीही कुठेही चोरी–दरोडेखोरी झाली तर पोलिसांनी पुरुष



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

मंडळींना उचलून नेणे, त्यांच्यावर जुलूम जबरदस्ती करणे, अकारणच समाजात तोंड लपवून हिंडण्याची वेळ येणे, कमालीचे दारिद्रय हे बेरड समाजाचे प्राक्तन होते. अज्ञान तर इतके की, या अन्यायाची खंत वाटण्याऐवजी 'हेच आपले नशीब आहे' अशा समजुतीने पिढ्यानपिढ्यांपासून मनात घर केलेले. प्रारंभी गस्तींचीही समजूत अशीच होती. परंतु, शिक्षणाच्या निमित्ताने जसजसे विस्तृत क्षेत्रात वावरणे, निरीक्षण, वाचन इत्यादी सुरू झाले तसतशी या अन्यायग्रस्ततेची बोच तीव्रपणे जाणवू लागली. स्वत: अशिक्षित असलेल्या वडिलांनी गस्तींना शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. शिक्षणात कुठे खंड पडला नाही. बेळगावातच शालेय शिक्षण, राजा लखमगौडा विज्ञान संस्थेमधून विशेष गुणवत्तेसह बी. एस्सी. झाल्यानंतर हैदराबाद येथील उस्मानिया विद्यापीठात जीवशास्त्र विषयात एम. एस्सी केली. त्याचवेळी अभ्यास करीत असताना मॉस्को येथील लुमुंबा विद्यापीठाची दरमहा शंभर रूबल्सची पाठ्यवृत्ती गस्तींना इस्कस या संस्थेमार्फत मिळाली आणि दोन वर्षे गस्ती मॉस्को येथे अध्ययनासाठी राहिले. तेथे जीवशास्त्रातील एम. टेक. ही पदवी मिळाली. तेथेच जीवशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवी प्राप्त केली.

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नॅशनल जिऑलॉजिकल रिसर्च सेंटरमध्ये रिसर्च असिस्टंट म्हणून त्यांनी काम केले. याच दरम्यान दारिद्रय आणि अज्ञान यांनी गांजलेला, सतत अत्याचार सहन करणारा, पिढ्यांपासून पोलिसी अन्यायाचा जाच सहन करणारा, अस्थिर, शोषित, दुर्लक्षित, तुच्छतेचे जीवन जगणारा आपला समाज त्याचे उन्नयन करण्याची जबाबदारी आपलीच आहे. आपली बुद्धिमत्ता, शिक्षणामुळे मिळालेली सामाजिक प्रतिष्ठा याचा उपयोग केवळ व्यक्तिगत प्रगती–समृद्धीसाठी करण्यापेक्षा समाजासाठी करावा अशा विचारातून गस्ती समाजकार्याकडे वळले. मात्र हैदराबातच्या वास्तव्यात त्यांचा 'गीता आश्रम' शी संबंध आला. त्यातून रा. स्व. संघाशी संबंध आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आदिंच्या कार्याचा व कर्तृत्वाचा परिचय, याच काळात गस्तींच्या वाचनात रॉबर्ट स्वेल यांचे 'Forgotten Empire' आणि कृष्णस्वामी अय्यंगार यांचे 'The History of Vijaynagar Empire' हे दोन ग्रंथ आले. या दोन्ही ग्रंथातून बेरड–रामोशी समाजाचा उज्ज्वल इतिहास डोळ्यासमोर उलगडला गेला. बेरड समाज स्वत:ची ओळख विसरला आहे. या समाजाने स्वत्व आणि सत्व गमावले आहे, त्याची पुर्नजागृती करायला हवी याची जाणीव झाली आणि चांगल्या पगाराची नोकरी सोडून गस्ती राष्ट्रीय स्वयं संघाच्या सहकार्याने भटक्यांच्या चळवळीत उतरले.

बेरड जमात ही ब्रिटीशांनी 'गुन्हेगार' ठरविलेली जमात! या जमातीचा इतिहास थेट इ. स. १३३० च्या विजयनगर साम्राज्याच्या इतिहासाशी भिडतो. हरिहर आणि बुक्कराय यांच्यापैकी बुक्कराय हा बेरड समाजाचा होता. याची राणी मुखांबिका ही श्रावणकोरच्या दोराईस्वामी या बेरड जमातीतील व्यक्तीची मुलगी होती. इ. स. १३३० ते १६६५ इतका प्रदीर्घ काळ विजयनगरवर बेरड घराण्यातील वीर पुरुष राज्य करीत होते. कृष्णदेवराय हा राजा बेरड जमातीचा होता. त्याच काळात विजयनगर राज्याचा परमोत्कर्ष साधला गेला. दक्षिण भारतात बेरडांची ३६ संस्थाने होती. शहाजी महाराजांचा सारा [illegible] कर्नाटकात गेला, त्यांचे संपूर्ण सैन्य बेरडांचेच होते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात पेरलेल्या स्वराज्याच्या स्वप्नाची प्रेरणा विजयनगरच्या साम्राज्यातूनच प्राप्त झालेली होती. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील अत्यंत महत्त्वाचे हेरखाते बेरड/रामोशी जमातीच्या बहिर्जी नाईकने सांभाळले. स्वत:चा जीव जोखमीत घालून आग्रा येथून सुटका करून घेण्यात शिवाजी महाराजांना सहाय्य करणारा हिरोजी फर्जंद बेरड होता. पेशवाईचा अस्त झाल्यानंतर इंग्रजी अंमलात एकामागून एक संस्थाने खालसा होऊ लागली. सैनिक बेकारीच्या खाईत लोटले गेले. उत्तर कर्नाटक आणि महाराष्ट्रात असलेल्या संस्थानिकांच्या सैन्यात बहुतांशी सैनिक बेरड रामोशी समाजाचे होते. त्यांच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. कित्तूरची राणी चेन्नम्मा हिने बेरडांच्या वतीने ब्रिटीशांशी झुंज दिली. याच काळात हा समाज जंगलवासी झाला. ब्रिटीशांवर छापे घालण्याच्या कामामुळे त्याच्यावर दरोडेखोरीचा शिक्का बसला. उमाजी नाईक यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात रामोशांचे बंड झाले. क्रांतीवीर वासुदेव बळवंतांच्या बंडामध्ये मांगाबरोबर रामोशीही होते. १८५७ च्या स्वातंत्र्य समरातही हा समाज त्वेषाने लढला. त्यामुळे ब्रिटिश शासनाची वक्रदृष्टी त्यांच्यावर होती. डोंगर–दऱ्यांचा आश्रय आणि दारू गाळणे, चोरी करणे त्यांचे उपजीविकेचे साधन बनले. या लढावू जमातीचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांनी १८७१ साली गुन्हेगारी कायदा संमत केला. या कायद्यांतर्गत समाजातील पुरुषांना दिवसातून तीनदा पोलीस ठाण्यावर हजेरी देण्याची सक्ती लागू केली गेली. ती थेट १९५७ पर्यंत चालू होती. सेटलमेंटमध्ये बेरड समाज अन्य भटक्या जमातींच्या बरोबर बंदिस्त झाला.

स्वातंत्र्यानंतर रामोशी बेरडांची अवहेलना आणि भटक्या बांधवांची विटंबना चालूच राहिली. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दलित मुक्तीच्या लढ्याचीही व्याप्ती भटक्या समाजापर्यंत पोचू शकली नाही. पारधी, कैकाडी, गोंधळी, वडार, कोल्हाटी, डोंबारी, बेरड, रामोशी यासारख्या असंख्य भटक्या जमाती झुंजार, लढाऊ असूनही हा समाज रानावनात–दऱ्याखोऱ्यातच भटकत राहिला. स्वातंत्र्याचे, प्रगतीचे, समृद्धीचे वारे त्यांच्यापर्यंत पोहोचले नाही. कुठेही चोरी झाली, दरोडा पडला तर गावातल्या बेरडांना पोलीस उचलून नेत व त्यांचा अमानुष छळ करीत. पोलीस अत्याचाराने काही रामोशांचे मृत्यू होत असत. १९६६ साली इंडॉल कंपनीने बेळगावच्या आसपासच्या परिसरातून सुमारे १६०० एकर जमीन संपादन केली होती. यात अनेक जातीधर्माच्या लोकांच्या जमिनीचा समावेश होता. जवळपासच्या ७–८ खेड्यातून हे जमिनीचे हस्तांतरण झाले परंतु, त्याचा फारसा मोबदला लोकांना मिळाला नव्हता. शेती हेच रोजीरोटीचे साधन होते व तेही हिरावून घेतले गेल्यामुळे बेरोजगारी व उपासमारीची पाळी आली होती. समाज असंघटीत असल्यामुळे या अन्यायाविरोधात कोणी आवाजही उठवत नव्हते. हाच प्रश्न हाती घेऊन गस्तींनी समाज संघटीत करायला सुरुवात केली. या अन्यायग्रस्तांचे गाऱ्हाणे घेऊन आम्ही इंडॉलच्या व्यवस्थापनाकडे गेलो. कलेक्टरांना निवेदन दिले. हळूहळू संघटित चळवळीचा दबाव वाढू लागला. तलाठी, मामलेदार यांच्या गाठीभेटी घेऊन जमिनीची कागदपत्रे तयार करून घेतली. त्या आधारे इंडॉल कंपनीकडे नुकसान भरपाई नको, तर अन्यायग्रस्तांना कंपनीत नोकऱ्या मिळाल्या पाहिजेत असा आग्रह धरला. त्यासाठी अर्ज, विनंत्या, धरणे, मोर्चे असे आंदोलन सर्व मार्ग चोखाळले. या चळवळीत समाजाचे सर्व अन्यायग्रस्त घटक समाविष्ट झाले होते. त्या चळवळीतील विधायकतेमुळे यश मिळत गेले. सुमारे १३०० लोकांना काम मिळाले. शेकडो कुटुंबांना नुकसान भरपाई मिळाली. एक लढा यशस्वी झाला. भटक्यांच्या चळवळीला बळ मिळाले.

१९७५ च्या जून महिन्यात देशात आणिबाणी लागू झाली. वास्तविक गस्ती सामाजिक चळवळीत होते. पण ते राष्ट्रीय स्वयं संघाशी संबंधित होते. त्यांना अटक झाली. १९ महिने गुलबर्गा येथे कारावास घडला. तुरुंगात असताना बेळगावचे श्री. राम आपटे व



Signature Not Verified
SHAHAJAHAN
MEHABUB MANER
Document Certified

धारवाडचे श्री. वामनराव देशपांडे यांच्याशी संबंध आला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा फार मोठा प्रभाव गस्तींवर पडला. गस्तींच्या चळवळीमुळे शेकडो हातांना काम मिळाले. पण या विधायक कामाला प्रसिद्धी मात्र मिळाली नाही. या सीमा प्रश्नावरील लढ्यात लाठी हल्ला झाला तरी मोठी बातमी होई. उलटपक्षी बेरडांना गोळ्या घालून ठार मारले तरी ती बातमी होत नसे. ही चळवळ समाजासाठी आहे. आपण हक्कासाठी भांडतो, झगडतो आहोत याचे भान ठेवून लोकसंघर्ष समितीच्या माध्यमातून भटक्यांचा संघर्ष चालू होता. या चळवळीचे फलित म्हणजे बेरड जमातीमधील लोकांना अन्यायाची जाणीव झाली तर त्याविरूद्ध लढा देता येतो हे त्यांच्या लक्षात आले. रोजगार मिळाल्यामुळे हजारो बेरड लोकांना सुखसमृद्धीची कवाडे खुली झाली. चोर, दरोडेखोर म्हणून गणल्या गेलेल्या समाजाला जीवन जगण्याचे साधन मिळाले. त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळले व पुढची पिढी शिक्षणाच्या प्रक्रियेत सामील झाली. आर्थिक उन्नतीचे मार्ग मोकळे झाले. हे परिवर्तन चळवळीमुळे घडून आले.

१९७७ साली कारावासातून सुटका झाल्यानंतर देखील हैदराबाद येथील संशोधन संस्थेने गस्तींना सन्मानाने नोकरीत परत बोलावले. पण आता नोकरी करणे शक्य नसल्याने नोकरीचा राजीनामा देऊन गस्तींनी सार्वजनिक कार्याची दिशा पक्की केली.

१९७७ नंतर खऱ्या अर्थाने सामाजिक चळवळ उभी राहिली. गस्तींनी बेळगाव, विजापूर, कोल्हापूर, सांगली या भागात जेथे जेथे बेरड–रामोशी समाजाची वस्ती आहे तेथे दौरा केला. या भागातील बेरडांची दु:खं, दैन्यावस्था पाहिली. हा समाज देव आणि धर्म मानणारा आहे, वचनाला पक्का आहे. पोटाला पुरेसे मिळत नाही म्हणून गुन्हेगारीकडे तो वळला आहे. गुन्हेगारी ही त्याची वृत्ती नाही. परिस्थितीने त्याला तसे बनवले. प्रकल्पग्रस्त भागातील प्रश्न वेगळे आहेत. डोंगराळ भागातील प्रश्न वेगळे आहेत. डोंगराळ भागात पाळेगार, ठाकूर, देशमुख हे प्रामुख्याने वेठबिगारी व शेतमजुरी करतात. काही अल्पभूधारक आहेत. खेड्यापाड्यातून जात पंचायतीचे वर्चस्व होते. मात्र या भागात विकासाचे काम होत नव्हते. या समाजाच्या नीति–अनीतिच्या कल्पना सैल होत्या. बेरडांच्या बायका पळवून नेल्या तरी त्याचे कोणाला काही वाटत नसे. रूढी, परंपरा, अंधश्रद्धा यांचा समाजावर वरचष्मा होता. तर जातपंचायतीच्या परंपरागत दृष्टिकोनामुळे त्रासच जास्त होता. ही परिस्थिती पाहिल्यानंतर गावागावातील समजदार व प्रतिष्ठित समाजबांधवांशी बोललो. समाजाला सोसाव्या लागणाऱ्या हालअपेष्टांविषयी, अन्यायाविषयी चर्चा होऊ लागली. स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही आम्हाला पोलिसांच्या लाथा आणि गोळ्या खाव्या लागतात. असे प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण केले. यातून आपल्या समाजाला बाहेर काढले पाहिजे, गावोगावच्या समाजबांधवांची एक बैठक यमुनानगर येथे आयोजित केली. इंडोंलच्या प्रकल्पग्रस्तांचे जे पुनर्वसन झाले, जे परिवर्तन झाले ते सारे या प्रतिनिधींना प्रत्यक्ष पहावयास मिळाले. भाषणे, चर्चा यांनी ते साध्य होऊ शकणार नाही ते या प्रत्यक्ष उदाहरणाने साध्य झाले. प्रथम पोलिसी अत्याचाराविरुद्ध लढा देण्यासाठी सर्वांना सिद्ध केले. त्यांना शेतीचे शिक्षण दिले. शासनाकडे डोंगराळ पडीक जमिनीची मागणी केली. त्यासाठी मोर्चे, निवेदने, धरणे यासारखे सनदशीर मार्ग अवलंबिले. १९७८ ते १९८२ पर्यंत या चळवळीचे जे स्वरूप राहिले त्यामुळे पोलिसी अत्याचार कमी झाले. समाजात अन्यायाविरुद्ध जागृती उत्पन्न झाली. दारू गाळणे, चोऱ्या करणे हे पारंपरिक धंदे कमी झाले.

शासनाकडून जमिनी मिळाल्यामुळे रोजगार वाढला. कष्ट करण्याची सवय लावली. मैलोनमैल चालत जाण्याची शिकवण दिली. काहीही आयते वा फुकट घ्यायचे नाही, कष्ट करूनच रोजीरोटी मिळवायची हे त्यांच्या मनावर ठसविले. हळूहळू शिक्षणाकडे ओढा निर्माण होईल यासाठी प्रयत्न केले. त्यांच्यात संस्काराची ओढ निर्माण झाली. कार्य प्रत्यक्षात उभे राहण्यासाठी काही रचना उत्पन्न करणे आवश्यक होते. गाव समिती, त्यातून गाव प्रतिनिधी, ५ गावांचा एक गट, ५ गटांचा १ विभाग व विभाग प्रतिनिधींची केंद्रीय समिती अशी ती रचना होती. औपचारिक संघटन व पदाधिकारी अशी रचना नव्हती, कारण त्यात पुढेमागे लाभ, पदे–मालमत्ता यावरून फाटाफूट होण्याची व मूळ उद्दीष्ट बाजूला पडण्याची शक्यता होती. ही कार्यकर्त्यांनी स्वयंप्रेरणेने चालविलेली सामाजिक चळवळ राहिली पाहिजे यावर सर्वांनी भर दिला. अत्याचार मुक्ती, शेती, शिक्षण, पुनर्वसन व रोजगार या चळवळीच्या पंचसुत्रीने कार्यकर्त्यांच्या विचाराला व कार्याला दिशा मिळाली. संघटीत शक्तीचे चांगले परिणाम दिसू लागले. प्रकल्पग्रस्त, डोंगराळ भागातील वस्ती, स्त्रिया यांच्या प्रश्नांचे स्वरूप वेगवेगळे होते. त्यामुळे त्यांच्या चळवळीचे स्वरूपही वेगळे राहीले. उत्तर कर्नाटक, कोल्हापूर व सांगली येथे या समाजाची संख्या मोठी होती. त्यामुळे जमिनीचे लढे या भागात लढले गेले. कोल्हापूर जिल्ह्यात याचे प्रमाण सर्वात जास्त होते. एका बाजूला पोलिसी अत्याचारापासून मुक्ती व दुसऱ्या बाजूला रोजगार मिळवून देणे अशा दुहेरी पद्धतीने ही चळवळ पुढे जात राहिली. १९८३ पासून या समाजाचा समावेश अनुसूचित जमातीत करून घेण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू केले. १९८५ साली रामकृष्ण हेगडे मुख्यमंत्री असताना याविषयीचा ठराव विधानसभेत संमत झाला. १९८९ साली तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी बेळगावला आले तेव्हा हजारो समाजबांधवांनी त्यांच्यासमोर शांततापूर्ण निदर्शने केली. चंद्रशेखर व देवेगौडा यांच्या पंतप्रधानपदाच्या काळात म्हणजे १९९१ साली या समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश व्हावा यासाठी केलेली चळवळ यशस्वी झाली. शिक्षण व नोकरी यात आरक्षणामुळे संधी उपलब्ध झाल्या. चळवळीने मार्ग आखून दिला. चळवळ चिकाटीने चालविल्यामुळे अनेक प्रश्न सुटले, अनेक प्रश्न मार्गी लागले.

१९८७ पर्यंत बेरड समाजात काम करणारा कार्यकर्ता म्हणून प्रतिष्ठा लाभली. ज्ञान प्रबोधिनी या स्वरूपवर्धिनीचे संचालक व रा. स्व. संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक यशवंतराव लेले यांची या काळात गस्तींची ओळख झाली. त्यांनी सामाजिक कार्याची जी दृष्टी गस्तींना दिली. त्यामुळे चळवळीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलून गेला. भीमराव गस्ती हिंदुत्वाकडे वळले. यशवंतराव लेले अत्यंत कडक. त्यांच्या सहवासात सामाजिक कार्यासंबंधी गस्तींच्या कल्पना स्वच्छ व स्पष्ट होत गेल्या. सरकारी मदतीशिवाय व लोकसहभागातून जीवनाचा विकास करण्याचे व त्यासाठी पडेल ते कष्ट करण्याचे महत्त्व कळाले. 'उत्थान' संस्थेच्या मार्फत सुरू झालेल्या चळवळीचे दोन भाग आहेत. एका भागात या भटक्या समाजाला स्थैर्य मिळवून देण्यासाठी सरकारी योजनांच्या माध्यमातून घरे बांधून दिली. त्यांना छोटे–मोठे व्यवसाय व रोजगार उपलब्ध करून दिले. दुसऱ्या बाजूला मामलेदार, जिल्हाधिकारी, मंत्री, मुख्यमंत्री यांच्या कार्यालयावर व्यावहारिक मागण्या घेऊन मोर्चे काढले. संघर्ष उभा केला. पोलिसांच्या विरोधातही संघर्ष होता. (मुलाखत – भिमराव गस्ती, कुबनूर, बेळगाव.)

सारांश :– १९७८ ते १९८७ हा कालखंड बेरड समाजाच्या चळवळीचा धगधगता कालखंड होता. हजारो समाजबांधवांचे इतके शिस्तबद्ध मोर्चे कोणी कधीच पाहिले नव्हते. कायदा तोडणे नाही, दगडफेक नाही पण आपल्या न्याय मागण्यावर ठाम, यातून चळवळीची वीण घट्ट होत गेली. यशवंतराव लेले यांच्या



Signature Not Verified
SHAHAJAHAN MEHABUB MANER
Document Certified

सहवासातून चळवळ ही संस्कारित असली पाहिजे याचा बोध झाला. ही संस्कारमालिका रा.स्व. संघाच्या माध्यमातून सहज उपलब्ध आहे, हे लक्षात आले. त्यातून गस्ती संघाकडे गेले आणि आज त्यांचे अवीचल निष्ठेत रूपांतर झाले आहे. गस्तींच्या कामाचे मोल ओळखून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने त्यांना सामाजिक कार्याची दृष्टी दिली. यामुळे गस्तींना स्वत:ला व कार्यकर्त्यांना लाभ झाला असा दावा गस्ती करतात. एकंदरीत, सीमाभागात गस्तीमुळे भटके राष्ट्रीय स्वयं संघाच्या माध्यमातून चळवळ करू लागले. तर महाराष्ट्रात इदाते वगैरे राष्ट्रीय स्वयं संघाचा विचार भटक्यांच्यात घेऊन गेले. परिवर्तनाच्या चळवळीमध्ये 'सैनिक' निर्माण करण्याऐवजी गस्ती हे राष्ट्रीय स्वयं संघामध्ये गेल्याने त्यांनी भटक्यांच्या चळवळी 'सेवक' निर्माण केले.

भटक्या विमुक्तांच्या चळवळीचा इतिहास हा १७ व्या शतकापासून सुरु झाल्याचे दिसते. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी जो आदिवासी समाज हा आपल्या क्षेत्रात जीवन जगत होता. या जगण्याचा आधार हा जंगल होता. जंगलाच्या साहाय्याने जीवन जगणाऱ्या आदिवासींच्या जीवनावर ब्रिटिश सरकारने आक्रमण करण्यास सुरुवात केली. या आक्रमणास विरोध करण्यातून भटक्या विमुक्तांची चळवळीची सुरुवात झाली.

आक्रमक आदिवासींचा बंदोबस्त करण्यासाठी ब्रिटिशांनी गुन्हेगारी जमाती म्हणून कायदे केले. या कायद्यांना जमातींनी विरोध केलाच तसे भारतीय न्यायव्यवस्थेमधील न्यायाधिश यांनीही या अमानवी कायद्यांना विरोध केला होता. न्यायाधिश या बुद्धिजीवी वर्गाचे लक्ष जेंव्हा १८७१ च्या गुन्हेगार कायदा आणि त्यातील तरतुदीकडे गेले. तेंव्हा भटक्या विमुक्तांच्या चळवळीला एक विधायक दिशा मिळत गेली. १९४७ ला भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले होते. तरीही तीन तारेच्या कंपाऊंडमध्ये डांबून ठेवलेल्या जमातींना स्वातंत्र्यप्राप्त झाले नव्हते. या जमातींना आता तरी स्वातंत्र्य देण्यात यावे. यासाठी वसाहतीमधील पहिली पिढी आक्रमक झाली आणि १९५२ ला गुन्हेगार जमाती कायदा रद्द करण्यात आला. परंतु, प्रत्यक्षात १९६० ला तीन तारेच्या तुरूंगातून भटक्या विमुक्तांची सुटका करण्यात आली.

१९६० ला तीन तारेच्या तुरुंगातून सुटका करण्यात आली. परंतु, या जमातींना मुक्त केल्यानंतर या जमातींना नागरी सुविधांचे काय याचा विचार मात्र शासनाने केला नव्हता. हे खेदजनक होते

१९६० ला तीन तारेच्या तुरुंगातून मुक्त झालेल्या विमुक्त–जमातींच्या पुढे नवीन आव्हाने, नवीन समस्या निर्माण झाल्या. या जमातींचे जगण्याचे अस्तित्व नाकारले गेले. १९६० नंतर उद्‌भवलेल्या नवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी भटक्या विमुक्तांच्यातील साक्षर लोक ज्यांना जो मार्ग आणि विचारधारा जवळची वाटेल किंवा या विचारधारेमुळे आपल्या समाजाचे प्रश्न मार्गी लागतील वा आपल्या समाजाच्या प्रश्नांचे निराकरण होईल. त्या–त्या विचारधारेचे पाईक होण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला.

राष्ट्रीय सेवादल, समाजवादी, राष्ट्रीय सेवक संघ या समाज विचारांच्या विद्यापीठांकडे भटक्या विमुक्तांचे लोक वळले आणि या विचारांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी सक्रिय झाले.

*संदर्भ :–*

1. *डॉ.जे.बी.अंबेकर, द ट्राईबल सिटयुएशन इन महाराष्ट्र ,अप्रकाशित निबंध, पृ.क्र.८.*
2. *वी. राघवय्या: १९६८, 'नोमॅड', पृ. क्र. १७३, १७४, प्रकाशन– भारतीय आदिम जाती सेवक संघ, सिकंदराबाद.*
3. *लक्ष्मन माने, १९९७, 'विमुक्तायन', पृ. क्र. १२५, प्रकाशन– यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.*
4. *किता, पृ. क्र. १२६.*
5. *किता, पृ. क्र. १२७.*
6. *किता, पृ. क्र. १३०.*
7. *किता, पृ. क्र. १३२, १३३.*
8. *भीमराव जाधव, २०१३, 'कथा काटेरी कुंपणाची', पृ. क्र. ६१, अनुबंध प्रकाशन, पुणे.*
9. *मोतिराज राठोड: २००५, 'गुन्हेगार जमाती कायदा आणि परिणाम', पृ. क्र. ३६, प्रकाशक– दुर्गादास गिरी, जालना.*
10. *मुलाखत, बाळकृष्ण रेणके, दि. १९/११/२०१५, मुंबई.*
11. *विकीपिडीया, दि. १५/०२/२०१७.*
12. *लक्ष्मन माने, १९८०, 'उपरा', पृ. क्र. २०, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.*
13. *मुलाखत, भीमराव गस्ती, कुबनूर, बेळगाव.*



Signature Not Verified
SHAHAJAHAN
MEHABUB MANER
Document certified